रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १८३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## शॉर्टसर्किटमुळे घराला आग

**रसायनी :** शॉर्टसर्किटमुळे घराला आग लागल्याची घटना रसायनीतील कांबे गावात घडली. आगीत म्हात्रे कुटुंबाच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. सुदैवाने घरातील सर्वजण समयसूचकता दाखवत बाहेर पडल्याने जीवितहानी टळली आहे. कांबे गावात विठ्ठल म्हात्रे आणि वसंत म्हात्रे यांचे एकमजली कौलारू घर आहे. दुपारच्या सुमारास घराच्या बाजूस कौलातून मोठ्या प्रमाणात धूर दिसल्यानंतर शेजाऱ्याने आरडाओरड केला. घरात असलेले म्हात्रे कुटुंबातील सर्वजण तातडीने लाकडी वासे आणि फायबर पीओपीमुळे आग झपाट्याने वाढली. पान २ वर

## बार कौन्सिलमध्ये महिलांना आरक्षण

**नवी दिल्ली :** न्यायालयीन व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवण्याच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक राज्यात सक्रिय असणाऱ्या बार कौन्सिलमध्ये महिला वकिलांना ३० टक्के आरक्षण देण्याचे आदेश दिले आहेत. ज्या राज्य बार कौन्सिलच्या निवडणुका अद्याप अधिसूचित झालेल्या नाहीत, अशा बार कौन्सिलमध्ये ३० टक्के जागांवर महिला वकिलांचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. सध्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांना हक्काचे स्थान मिळाले आहे. मात्र, महिलांच्या हक्कासाठी कायदेशीर लढाई लढणाऱ्या महिला वकिलांना बार कौन्सिलमध्ये आरक्षण नव्हते.

### वे|ध|क

## एमपीएससीची पूर्व परीक्षा पुढे ढकलली

**मुंबई :** राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सर्वच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, नव्याने परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून, ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अनुक्रमे ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित केल्याचे शुध्दीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

## कर्नाटकात मराठी नेत्यांची धरपकड

**नवी दिल्ली :** कर्नाटकमध्ये आजपासून हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनासाठी बेळगावला जात असताना महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांची धरपकड करण्यात आली आहे. त्यामुळे कर्नाटकात मराठी जनतेमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले आहे. कोल्हापुरात ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी एसटी डेपोत जोरदार निदर्शने करून कर्नाटक सरकारचा निषेध नोंदवला आहे. तर कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवर तणावाचे वातावरण झाल्याने कर्नाटक-महाराष्ट्र एसटी सेवा तात्पुरती बंद करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही राज्यात जाणाऱ्या प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल झाल्याचे चित्र दिसून आले.

## आरोपींच्या कोठडीत वाढ

**नवी दिल्ली :** लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींच्या कोठडीत न्यायालयाने चार दिवसांची वाढ केली आहे. दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू बजाज चंदना यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयानं चारही आरोपींच्या एनआयए कोठडीची मुदत वाढवून दिली. न्यायालयानं एनआयए कोठडीत वाढ केलेल्या आरोपीत पुलवामा इथला डॉ. मुझम्मिल शकील गनई, जम्मू-काश्मीर इथला डॉ. आदिल अहमद रहतर, लखनऊ इथला डॉ. शाहीन सईद, जम्मू-काश्मीर इथला मुफ्ती इरफान वागे या आरोपींचा समावेश आहे.

# मागासवर्गीय मुलींना मिळणार हक्काचा निवारा

## शेकाप नेते जयंत पाटील यांच्या प्रयत्नांना यश



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मुलींना शिक्षण घेता यावे, यासाठी रायगड जिल्ह्यात शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून अलिबागमधील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह भाडेतत्त्वावर चालत होते. आता मात्र हक्काचे वसतिगृह मुलींना मिळणार आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रयत्नाने अलिबागमधील शासकीय वसतिगृहाच्या इमारतीला मंजुरी देण्यात आली आहे. आठ कोटी ५७ लाख ८९ हजार रुपयांच्या निधीची मंजुरी देण्यात आली आहे.

### मुलींच्या शिक्षणाला मिळणार गती

सामाजिक न्यायाच्या उद्देशाने मागासवर्गीय मुलींना शासकीय सुविधा देण्याचे नियोजन आहे. जिल्हाभरात वसतिगृहासाठी इमारती आहेत. परंतु, अलिबाग येथील असणारी इमारत जीर्ण झाल्याने हे वसतिगृह भाड्याच्या जागेत उभारण्यात आले असून, तिथून सर्व कारभार चालत आहे. ही गंभीर बाब शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या लक्षात आणून दिली. भाई जयंत पाटील यांनी पाठपुराव्यामुळे इमारतीसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाला खऱ्या अर्थाने जयंत पाटील यांच्यामुळे गती मिळणार आहे.

सामाजिक न्या व विशेष सहाय्य विभागांतर्गत अलिबागमध्ये समाजकल्याण कार्यालय आहे. या कार्यालयाच्या अखत्यारित महाड येथे मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, तळा येथे मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, अलिबागमध्ये मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, महाड येथे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अलिबागमध्ये मागासवर्गीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पाली-सुधागडमध्ये मागासवर्गीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, तसेच माणगावमधील जावळी येथे अनुसूचित जाती, नवबौद्ध मुलांकरिता शासकीय निवासी शाळा आहेत. त्यात सात शासकीय वसतिगृह आहेत. यातील दोन शासकीय वसतिगृह व निवासी शाळा मालकीच्या जागेत आहेत. उर्वरित पाच शासकीय वसतिगृह खासगी जागेत आहेत. त्यामध्ये अलिबागमधील मागासवर्गीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाची इमारत गोंधळपाडा येथे होती. परंतु, ही इमारत जीर्ण झाल्याने खासगी जागेत वसतिगृह उभारण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून भाडेतत्त्वावर या इमारतीचा कारभार चालत आहे.

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या ही बाब निदर्शनास आली. ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाला गती मिळावी म्हणून शेकाप सरचिटणीस यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांना पत्र पाठवून मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह इमारत बांधण्यासाठी निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी केली. त्यांच्या मागणीची दखल घेत शासकीय वसतिगृहासाठी आठ कोटी ५७ लाख ८९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जयंत पाटील यांच्या प्रयत्नाने अलिबागमध्ये मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी हक्काची इमारत लवकरच उभी राहणार आहे.

वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम केल्यास मागासवर्गीय व गरीब विद्यार्थीनींना शैक्षणिक संधी उपलब्ध होईल. शिक्षणात सातत्य राहून शाळा महाविद्यालय, सोडण्याचे प्रमाण कमी होऊन या विद्यार्थीनी उच्च शिक्षणाकडे वळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यातून समाजाचा सर्वांगिण शैक्षणिक व समाजिक विकास होण्यास मदत होईल.

# निविदेत घोळ; सोयीनुसार अटी व शर्ती?

## निविदा प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात

**प्रमोद जाधव**
**| अलिबाग |**

डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत राज्यातील जास्तीत जास्त कामकाज ई-गव्हर्नन्स पद्धतीने व्हावे व निविदा प्रक्रिया ही ई-निविदा प्रक्रियेने असावी, अशी सरकारची रोखठोक भूमिका आहे. निविदा प्रक्रियेत होणाऱ्या भ्रष्टाचारावर लगाम आणि कामकाजात पारदर्शकता आणू पाहणाऱ्या सरकारच्या या धोरणाला रायगड जिल्ह्यातील खारभूमी विकास मंडळाकडून सुरुंग लावण्यात आल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरु आहे.

खारभूमी विकास मंडळाकडून धेरंड खारभूमी योजनेच्या नूतनीकरणासाठी ३ कोटी ५३ लाख ३५ हजार ६६९ रुपयांच्या कामाची निविदा काढण्यात आली. कंत्राटदाराला निविदा भरण्यासाठी विभागाकडून २२ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०२५ पर्यंतचा म्हणजेच केवळ सात दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. या प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदार संस्थांना या कालावधीतच ऑनलाईन पद्धतीने अर्ज करायचे होते. यानंतर १ ऑक्टोबर रोजी ही निविदा उघडण्यात आली. जाहीर केलेल्या या ऑनलाईन प्रक्रियेत चार कंत्राटदार संस्थांनी भाग घेतला होता. या निविदा प्रक्रियेत प्रिमिअर सिव्हिल कंपनी प्रा.लि. या कंपनीला पात्र ठरविण्यात आले, तर अन्य शशांक आत्माराम सावंतदेसाई, श्रेयस सुधाकर म्हात्रे, डी.के. कन्स्ट्रक्शन या तीन कंपन्यांना अपात्र ठरविण्यात आले. नियमानुसार, एकाच एल-१ मध्ये जाण्यासाठी पान २ वर

### उच्चस्तरीय चौकशीची मागणी

धेरंड येथील साडेतीन कोटींचे हे काम ठराविक एकाच कंपनीला मिळावे म्हणून अधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रियेमध्ये शॉर्टकट मारला आहे. त्यामुळे टेंडरमध्ये गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे हा घोटाळा झाल्याचा संशय आहे. त्यामुळे या टेंडर घोटाळ्याची उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पाटील यांच्याकडून करण्यात आली आहे.

> पूर्वी चार जणांनी निविदा भरली असेल, त्यात तिघे अथवा दोघे अपात्र ठरल्यावर आर्थिक निविदा उघडता येत नव्हती. परंतु, शासनाने २०१८ मध्ये परिपत्रक काढले आहे. या परित्रकानुसार, एक पात्र ठरल्यास तसेच इस्टीमेंट खाली असल्यास त्या कंपनीला काम देता येते.
>
> – विजय पाटील, कार्यकारी अभियंता, खारलँड विभाग

## पोलीस पाटील धडकणार नागपुरात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्रातील पोलीस पाटीलांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या ११ डिसेंबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील हजारो पोलीस पाटील या मोर्चात सहभागी होणार असून, रायगड जिल्ह्यातून १५० हून अधिक पोलीस पाटील या मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कमलाकर मांगले यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.

हा मोर्चा यशवंत स्टेडियम, नागपूर येथून सकाळी १० वाजता विधिमंडळाकडे मार्गस्थ होणार आहे. गाव कामगार पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शिवाजीराव कोलते पान २ वर

## नेरळ गोळीबारप्रकरणी दोघांना अटक



**| नेरळ | प्रतिनिधी |**


नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत धामोते भागातील पेशवाई रस्त्यावरील पुलावर २५ नोव्हेंबराच्या रात्री सचिन अशोक भवर या व्यक्तीवर दुचाकीवरून आलेल्या तरुणांनी गोळीबार केला होता. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी नाशिक येथील दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्या आरोपीमधील अविनाश जगन्नाथ मार्के याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, चोरी असे विविध १५ गुन्हे दाखल आहेत.

धामोते येथील श्री स्वामी समर्थ चाळीमध्ये राहणारे सचिन अशोक भवर हे नोकरीच्या ठिकाणावरून घरी परत येत असताना पिशवी रस्त्यावर गोळीबार करण्यात आला होता. स्कुटी घेऊन घरी परत येत असताना सचिन भवर यांचा बदलापूर येथून पाठलाग करणाऱ्या विनायक मार्के आणि त्याच्या साथीदाराने सील्वर रंगाची सी.बी. झेड मोटारसायकल क्र. एम.एच.१५ डी.ई.८५१८ वरून येऊन सचिन भवर यांच्यावर गोळीबार केला होता. हा गुन्हा पूर्ववैमस्यातून घडला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पान २ वर

# विरोधी पक्षनेतेपदावरुन आरोपांच्या फैरी

**| नागपूर | दिलीप जाधव |**

- नागपुरात हिवाळी अधिवेशनास प्रारंभ
- सत्ताधारी-विरोधक यांच्यामध्ये जोरदार खडाजंगी



विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून नागपूर येथे सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात पहिल्यांदाच विधानसभा आणि विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहेत. जाणूनबुजून सरकार विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेवत असल्याचा आरोप विरोधकांनी केला, तर विरोधी पक्षनेते निवडीचा अधिकार मुख्यमंत्री किंवा सरकारकडे नाहीत, तो अधिकार विधिमंडळाचे अध्यक्ष, सभापतींचा आहे, असं सत्ताधाऱ्यांकडून सांगण्यात आले. दरम्यान, अधिवेशनाला 'वंदेमातरम्'ने सुरुवात झाली.

आगामी जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर फडणवीस सरकारने तब्बल ७५,२८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या वित्तमंत्री अजित पवार यांनी सादर केल्या. त्यावर येत्या १० आणि ११ डिसेंबर चर्चा आणि मतदान आणि कपात सूचनेचा कार्यक्रम अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत जाहीर केला.

आगामी जिल्हा परिषद आणि महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता आणि स्थगित केलेल्या २४ नगर परिषद आणि नगरपालिकेच्या निवडणुकांचे मतदान येत्या २० डिसेंबरला होत असून, राज्यातल्या पार पडलेल्या नगर परिषद आणि नगरपालिका निवडणुकांचे एकत्रित निकाल येत्या २१ तारखेला होत असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना आपापल्या मतदारसंघात जायचे असल्यामुळे नागपूरचे हिवाळी अधिवेशन आठवडाभरात उरकून घेण्यात येणार आहे.

राज्य सरकारमार्फत ज्येष्ठ पत्रकारांकरिता देण्यात येत असलेल्या बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेकरिता सरकारने २० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र, शासनाच्या किचकट नियमावलीमुळे कित्येक ज्येष्ठ पत्रकार या योजनेपासून पान २ वर

# सरकारी जमीन बळकावण्याचा डाव

## पुनाडे प्रकल्पग्रस्तांची जमीन गुजरातच्या संस्थेला; ग्रामस्थांचा तीव्र विरोध

**| उरण | प्रतिनिधी |**



तालुक्यातील पुनाडे येथील सरकारी जमीन अहमदाबादमधील बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामिनारायण संस्थेला देण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, यावर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हीच जमीन धरण प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी द्यावी, अशी मागणी २०२२ आणि २०२३ मध्ये करण्यात आली होती. मात्र, प्रकल्पग्रस्तांच्या मागणीकडे दुर्लक्ष करून बाहेरील संस्थेला जमीन देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रकल्पग्रस्त शेतकरी चंद्रकांत कमल पाटील यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांनी शासनाला लेखी निवेदन देत जमीन गुजरातमधील संस्थेला देण्याचा निर्णय झाला तर पुनाडे पंचक्रोशीत मोठा जनआक्रोश उसळेल, असा इशारा दिला आहे. १९९० साली लघु पाटबंधारे योजनेंतर्गत धरणासाठी पुनाडे, वशेणी आणि केळवणे गावांतील पिकत्या जमिनी मोठ्या प्रमाणावर संपादित करण्यात आल्या. त्यामुळे अनेक कुटुंबांचे शेतीवरचे उत्पन्नाचे साधन गमावले आणि आजही अनेकजण मोलमजुरीवर उदरनिर्वाह करतात. या पार्श्वभूमीवर प्रकल्पग्रस्तांनी गावातील उपलब्ध शासकीय जमीन पुनर्वसनासाठी द्यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, आमच्या पिकत्या जमिनी पान २ वर

## केंद्राकडून विशेष मोहीम हाती | एक डिसेंबरपासून महिनाभर काम सुरू

# मुंबई-गोवा महामार्ग होणार अतिक्रमणमुक्त

**| पेण | प्रतिनिधी |**

देशभरातील राष्ट्रीय महामार्ग अतिक्रमणमुक्त करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. महामार्गावरील अवैध अतिक्रमणे ओळखण्यासाठी आणि ते हटवण्यासाठी एक डिसेंबरपासून महिनाभर विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

मंत्रालयाचे सर्व प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ लिमिटेडच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पट्ट्यांची व्यापक तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय महामार्ग (जमीन आणि वाहतूक नियंत्रण) अधिनियम, २००२ नुसार अतिक्रमणासाठी कठोर दंडाची तरतूद आहे. अतिक्रमित जमिनीच्या प्रति चौरस मीटर ५०० रुपयांपर्यंत किंवा जमिनीच्या खर्चाच्या समतुल्य दंड आकारला जाईल.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग २००९ ला सुरु केला; परंतु आजतागायत हा महामार्ग पूर्ण झाला नाही. मात्र, या मार्गावरील पहिल्या टप्प्याचा विचार करता पळस्पेपासून इंदापूरपर्यंत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, पेण शहराच्या बाजूला भोगावती पान २ वर

**1 अतिक्रमणावर कठोर दंडाची केलेय तरतूद**
राष्ट्रीय महामार्ग (जमीन आणि वाहतूक नियंत्रण) अधिनियम, २००२ नुसार अतिक्रमणासाठी कठोर दंडाची तरतूद आहे. अतिक्रमित जमिनीच्या प्रतिचौरस मीटर ५०० रुपयांपर्यंत किंवा जमिनीच्या खर्चाच्या समतुल्य दंड आकारला जाईल.

**2 महामार्ग आजतागायत अपूर्णच**
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग २००९ ला सुरु केला; परंतु आजतागायत हा महामार्ग पूर्ण झाला नाही. मात्र, या मार्गावरील पहिल्या टप्प्याचा विचार करता पळस्पेपासून इंदापूरपर्यंत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे.

**3 मोबदला घेऊनही अतिक्रमण**
म्हाडा वसाहतीच्या काही प्लॉटधारकांनी मोबदला घेऊनही काही प्रमाणात अतिक्रमण केले आहे. तर, पलीकडच्या बाजूला मारक्यूस मंथन हॉटेललगत हावरे बिल्डर्सनेदेखील रस्त्याच्या बाजूला आपल्या होर्डिंग लावून अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

**4 खुलेआम टपऱ्यांचा बाजार**
कित्येक अंडरपासमध्येदेखील टपऱ्या लावून अतिक्रमण केले आहे. तसेच या अंडरपासमध्ये मोठ्या प्रमाणात पार्किंगसुद्धा केली जात आहे. एकीकडे महामार्ग काही ठिकाणी हस्तांतर झाला नाही म्हणून रखडला आहे, तर दुसरीकडे महामार्गासाठी संपादित केलेल्या जागांवर खुलेआम अतिक्रमण झालेले आहे.



# एसटीची वायफाय सेवा बंद

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एसटी महामंडळाने बसमध्ये मोफत वायफास सेवा सुरु केली होती. मात्र, दोन वर्षात ही सेवा बारगळी. २०१७ मध्ये सुरू केलेली ही योजना बंद पडली आहे.



त्यामुळे एसटी महामंडळाच्या या कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत.

गाव-वाड्यात राहणाऱ्या प्रवाशांना खासगी वाहनांचा पर्यायी मार्ग उपलब्ध लागला. ज्यादा पैसे मोजून निश्चित स्थळी वेळेवर पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे अनेकजण एसटी बसपासून दुरावलेले होते. एसटीतील प्रवासी संख्या वाढविण्यासाठी एसटी महामंडळाने २०१७ मध्ये बसमध्ये मोफत वायफाय सेवा सुरु केली. 'यंत्र मीडिया सोल्युशन' या कंपनीमार्फत ही सेवा सुरु करण्यात आली होती. या वायफायमुळे प्रवाशांना सिनेमांबरोबरच वेगवेगळ्या प्रकारच्या मनोरंजानाचे कार्यक्रम एसटी बसमधून पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे या उपक्रमाला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला. पान २ वर

## भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

**| उरण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील भेंडखळ गावाजवळ सोमवारी दुपारी घडलेल्या भीषण अपघातात भेंडखळ येथील अमोल काळूराम ठाकूर (३८) यांचा जागीच मृत्यू झाला. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बामर रॅली कंपनीसमोरील रस्त्यावरून जात असताना एमएच ४६ बीयू ५०७२ क्रमांकाच्या ट्रेलरने दिलेल्या जोरदार धडकेमुळे ही दुर्घटना घडली. धडक बसताच अमोल ठाकूर यांचा जागीच मृत्यू झाला, तर ट्रेलर चालक वाहन घेऊन पसार झाला.

अपघातानंतर काही क्षणातच ग्रामस्थ घटनास्थळी मोठ्या संख्येने जमले. मृतदेह रस्त्यावरच पडलेला असताना तीन ते चार तास उलटूनही प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय न घेतल्याने ग्रामस्थांचा पान २ वर

## पान १ वरून

### पोलीस पाटील धडकणार नागपुरात

पाटील यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे शासनाच्या उदासीनतेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. एप्रिल २०२४ मध्ये करण्यात आलेल्या मानधन वाढीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत असतानाच, उर्वरित महत्त्वाच्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

३१ ऑगस्ट २०२४ रोजी नागपूर येथे झालेल्या आभार मेळाव्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी उर्वरित सर्व मागण्यांवर प्राधान्याने निर्णय घेतले जातील, असे जाहीर केले होते. विशेषतः निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्याची मागणी सर्वाधिक प्राधान्याने विचारात घेतली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले होते. परंतु, आजपर्यंत कोणत्याही मागणीवर निर्णय न झाल्याने पोलीस पाटील वर्गात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

राज्यातील ग्रामस्तरावरील कायदा व सुव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या पोलीस पाटीलांना त्यांच्या हक्कांच्या आणि सन्मानाच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याची खंत संघटनेकडून व्यक्त करण्यात आली आहे. शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. ११ डिसेंबरचा मोर्चा हा राज्यातील पोलीस पाटीलांच्या संघर्षाला नवा प्रवाह देणारा ठरणार आहे. निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करणे, पहिल्या ५ वर्षांनंतरचे नूतनीकरण रद्द करून नियुक्ती निवृत्तीपर्यंत कायम ठेवणे, पोलीस पाटील व कुटुंबियांसाठी मेडिक्लेम योजना सुरू करणे, २०११ नंतर प्रवास व दैनिक भत्ता वाढ न झाल्याने, मानधनवाढीच्या प्रमाणात भत्त्यात वाढ करणे, राज्य सरकारतर्फे २५ लाख रुपयांचा विमा कवच निवृत्तीनंतर मानधनाच्या ५० टक्के रकमेचा 'निवृत्ती सन्मान निधी' पोलीस पाटील वेल्फेअर फंड सुरू करणे, छोट्या कुटुंबाच्या अटीतून १६ ऑगस्ट २०२४ पूर्वी नियुक्त पाटलांना वगळणे, गृह व महसूल विभागात ५ टक्के आरक्षण तसेच सलग १० वर्षे सेवा असलेल्या पाटीलांना नियुक्तीचा मार्ग मोकळा करणे, नक्षलग्रस्त भागातील पाटलांसाठी स्वसंरक्षण शस्त्र परवाने व सानुग्रह अनुदानात वाढ, ग्राम पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये आवश्यक सुधारणा, अतिरिक्त गावांचा पदभार सांभाळणाऱ्यांना प्रति गाव १० टक्के अतिरिक्त मानधन, पोलीस पाटीलांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती आदी मागण्या करण्यात येणार आहेत.

### विरोधी पक्षनेतेपदावरुन आरोपांच्या फैरी

वंचित राहिले आहेत.

विधिमंडळाच्या अधिवेशनाचे वृत्तसंकलन करण्यासाठी नागपुरात येणाऱ्या पत्रकारांसाठी गेली ५० वर्षे सुयोग हे निवासस्थान उपलब्ध केले जाते. मात्र, यावर्षी माहिती व जनसंपर्क विभागाने औरंगाबाद खंडपीठाने एका याचिकेवर दिलेल्या न्यायालयाच्या निर्णयाचा बाऊ करून वृत्तपत्राच्या एकाच प्रतिनिधीस सुयोगमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय केला. त्याचे तीव्र पडसाद उमटले. आणि मुंबईच्या मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वरिष्ठ पत्रकारांनी बहिष्काराचे अस्त्र उगारले. ही बातमी विधिमंडळाचे सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांनी तातडीने सुयोग निवासस्थानी येऊन परिस्थिती समजावून घेतली आणि यातून त्वरित मार्ग काढला. माहिती खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रामगिरी बंगल्यावर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी झालेल्या प्रकाराबद्दल ऊहापोह केला. तूर्त तरी या प्रकरणावर पडदा पडला आहे.

### महामार्ग होणार अतिक्रमणमुक्त

नदी सोडल्यानंतर रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. म्हाडा वसाहतीच्या काही प्लॉटधारकांनी मोबदला घेऊनही काही प्रमाणात अतिक्रमण केले आहे. तर, पलीकडच्या बाजूला मारक्यूस मंथन हॉटेललगत हावरे बिल्डर्सनेदेखील रस्त्याच्या बाजूला आपल्या होर्डिंग लावून अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. तसेच कित्येक अंडरपासमध्येदेखील टपऱ्या लावून अतिक्रमण केले आहे. तसेच या अंडरपासमध्ये मोठ्या प्रमाणात पार्किंगसुद्धा केली जात आहे.

एकीकडे महामार्ग काही ठिकाणी हस्तांतर झाला नाही म्हणून रखडला आहे, तर दुसरीकडे महामार्गासाठी संपादित केलेल्या जागांवर खुलेआम अतिक्रमण झालेले आहे. केंद्र शासनाच्या या अतिक्रमण विरोधी मोहिमेमुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटवण्यास मदत होईल.

### निविदेत घोळ; सोयीनुसार अटी व शर्ती?

एकाच कंपनीला पात्र ठरविता येत नाही. मात्र या निविदेत केवळ एकाच कंपनीला पात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे केवळ मर्जीतील ठेकेदाराला काम मिळविण्यासाठी खारभूमी विभागाने ही निविदा प्रक्रिया राबविल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. साडेतीन कोटी रुपये खर्चाचे हे काम एका कंपनीच्या घशात घालण्यासाठी खारभूमी विभागाने या प्रक्रियेत घोळ केला. त्यामुळे हे टेंडर आणि काम वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

निविदा प्रक्रिया पूर्ण न होता, आर्थिक निविदा उघडण्यात आली. शासनाचे नियम धाब्यावर बसवत मर्जीतील ठेकेदाराला ठेका देण्याचा प्रताप या विभागाकडून करण्यात आला आहे. प्रत्यक्षात चार जणांनी या प्रकल्पाच्या कामासाठी निविदा भरल्या होत्या. नियमाप्रमाणे तीन पात्र झाल्यावरच आर्थिक निविदा उघडणे गरजेचे होते. परंतु, त्या पद्धतीने संबंधित विभागाने न करता, तीन अपात्र ठरवूनदेखील निविदा उघडण्यात आल्याचा आरोप होत आहे.

### नेरळ गोळीबारप्रकरणी दोघांना अटक

या गुन्ह्याचा तपास लागावा यासाठी कर्जत पोलीस ठाणे व नेरळ पोलीस ठाण्याकडील संयुक्त तपास पथके तयार करण्यात आली होती. या गुन्ह्यातील आरोपपींचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करून आरोपीपर्यंत नेरळ पोलिसांचे पथक पोहोचले.

गुजरात व नाशिक परिसरात असल्याबाबतची माहीती मिळत होती. परंतु, आरोपीत हे सराईत गुन्हेगार असल्याने ते सतत त्यांचे वास्तव्य बदलत होते. यातील आरोपीत अविनाश जगन्नाथ मार्के हा संगमनेर खुनाच्या गुन्ह्यातून मागील पाच वर्षांपासून फरारी आहे. त्यामुळे आरोपींचा शोध घेणे अतिशय आव्हानात्मक होते. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी आपल्या नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाकडे जबाबदारी दिली. पोलीस उपनिरीक्षक सुशील काजरोळकर, सुशांत वरक, पोलीस हवालदार स्वप्नील येरुणकर, सचिन वाघमारे, पोलीस हवालदार राजाभाऊ केकाण, आशु बेंद्रे आणि विनोद वांगणेकर यांच्या पथकाने नाशिक परिसरात आठ दिवस तळ ठोकून तेथे तपास पथकाने त्या आरोपींच्या वास्तव्याबाबत अतिशय शिताफीने पाठलाग करून दि. ५ डिसेंबर रोजी पकडले. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले गावठी कट्टा, राऊंड व सी.बी. झेड मोटारसायकल क्र. एम.एच.१ डी.ई.८५१८ डी.ई.८५१८ असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी अविनाश जगन्नाथ मार्के आणि दिपक विनायक कोळेकर यांना नाशिक येथून ताब्यात घेतले असून, त्यांना न्यायालयाने १० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### सरकारी जमीन बळकावण्याचा डाव

धरणासाठी घेतल्या आणि आता पुनर्वसनाची जमीनही परगावच्या संस्थेला देणार? हा अन्याय आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. याप्रकरणी ग्रामस्थांनी शासन निर्णय रद्द करण्याची, प्रकरणी पुनर्विचार करण्याची आणि जिल्हा तसेच कोकण विभाग पातळीवर जनसुनावणी घेण्याची मागणी केली आहे.

### एसटीची वायफाय सेवा बंद

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून सर्वजण एसटीतून प्रवास करू लागले. मात्र, दोन वर्षातच ही योजना बारगळी. कंपनीला ही सेवा देणे न परवडण्यासारखे झाले. त्यामुळे वायफाय सेवा बंद करण्यात आली. त्याचा परिणाम एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची निराशा झाली. ही योजना बारगळ्याने प्रवाशांमधून नाराजीचे सूर उमटत आहेत. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एसटी महामंडळ विविध योजना राबवित आहे. दरवर्षी प्रवासी वाढवा अभियान राबविले जाते. एसटी महामंडळात शिवशाही बस आणून नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, या बसमध्ये वातानुकूलित यंत्र बिघडलेले, पडदे फाटलेले अशा अनेक असुविधांमुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. त्यामुळे याकडे महामंडळ विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

### भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

संताप कडेला पोहोचला. ''मयताच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई मिळेपर्यंत मृतदेह हलविणार नाही,'' असा ठाम इशारा ग्रामस्थांनी दिला. परिणामी रस्त्यांवर ठिय्या देत रास्ता रोको करण्यात आला. या संपूर्ण घटनेने भेंडखळ गावात शोककळा पसरली असून अपघातातील आरोपी ट्रेलर चालकावर कठोर कारवाई आणि मयताच्या कुटुंबीयांना योग्य नुकसानभरपाई देण्याची ग्रामस्थांची मागणी आहे. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पुढील तपास सुरू केला आहे.

### शॉर्टसर्किटमुळे घराला आग

तातडीने पाताळगंगा अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. आग झपाट्याने वाढत घराच्या खालील बाजूसही पसरल्याने घरातील सर्व सामान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करत आग आटोक्यात आणली. परंतु, आगीमध्ये म्हात्रे कुटुंबाचं प्रचंड नुकसान झाले आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**
**ता. माणगाव, जि. रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत देवळी मध्ये ग्रामनिधी व १५ वित्त आयोग योजने अंतर्गत खालील काम करण्यासाठी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव अंदाजपत्रकीय रक्कम | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालवधी | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | १ टक्का इसारा रक्कम | कोरे निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | देवळी येथे गटार बांधणे | १५२९२९/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५ | १५२९/- | २००/- |
| २ | देवळी कोंड येथे गटार बांधणे | १५००००/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५ | १५००/- | २००/ - |
| ३ | देवळी अंतर्गत गटार बांधणे | ६१६८३/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५ | ६१६/- | २००/- |
| ४ | देवळी येथे गटार बांधणे | १५००००/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५ | १५००/- | २००/- |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालयाकडे जाणारा रस्ता करणे | १६००००/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५. | १६००/- | २००/- |
| ६ | मूर शाळा दुरुस्त करणे | १०००००/- | १५/२/२०२६ | १५/१२/२०२५ | १०००/- | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. १६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय देवळी येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३) कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच देवळी यांना राखून ठेवला आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील.
५) मा. उपभियांता सो बांधकाम/पाणीपुरवठा उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रा.पं चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली सदर काम देखरेखीखाली करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे
६) काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत परत केली जाईल.

**सही**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**

**सही**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देवळी**

**जाहिर नोटिस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळिवण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे....

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव :१) सहादेव आंबाजी हाटे, २) विनायक सहादेव हाटे, ३) छाया भिवाजी सपकाळ, ४) वैशाली किरण साळवी सर्व रा.मु.पो. वीर,ता. महाड जि. रायगड

| मौजे | गट. नं | भो.ग.वर्ग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| वीर | ४८१ | २ | ०.६९.०३ | १२.३७ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात योग्य ते कागदपत्रे पुराव्यासहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

माणगाव
दिनांक :- ०८-१२-२०२५

सही/-
(ॲड. पी.एम. जाधव)
ADVOCATE
MR.P.M.JADHAV
B.COM., LL.B
AT.PO:- (INDAPUR).
TAL:- MANGAON, DIST:- RAIGAD,
MO.NO:-7219546097

**राजेश खैरे**
**वकील व नोटरी**
**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रीतम हेमंत पाटील आणि २) विष्णु विठ्ठल पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह राजेश खैरे, ३ ब-२१, कलपतरू रिवरसाइड फेझ १, बिल्डिंग ३ अँड ४, हाऊसिंग सोसायटी, पनवेल मार्केट यार्ड रोड, पनवेल ४१० २०६ येथे तसे हक, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-परहुरपाडा, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३२९, एकूण क्षेत्र ००-८३-७० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. २२.१९/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०९/१२/२०२५
सही/-
**राजेश खैरे**

# बसथाब्यांसाठी कोरडोंचा चुराडा

## ।। ३८ बसथांब्यासाठी दहा कोटींहून अधिक खर्च




**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका हद्दीत बांधलेल्या ३८ बसथांब्यांचा खर्च दहा कोटींहून अधिक असल्याचे माहिती अधिकारात उघड झाले आहे. एका बस थांब्याचा खर्च २६ ते २७ लाख रुपये असल्याने सारे अचंबित झाले आहेत. याऐवजी स्वतःची परिवहन बससेवा सुरू करायला हवी होती, असे जाणकारांचे मत आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीत एकूण ३८ बसथांबे विकसित करण्यात आले आहेत. हे बसथांबे विकसित करण्याचे कार्यादेश बोरकर पॉलिमर्स यांना देण्यात आले असून, प्रतिबसथांबा २२ लाख ८९ हजार रुपये (जीएसटी वगळून) एवढा खर्च येत आहे. जीएसटी पकडून जवळपास २६ ते २७ लाख रुपये एका बस थांब्याचा खर्च आहे.

पनवेल महानगरपालिका होऊन नऊ वर्षे उलटून गेली तरीदेखील पनवेल पालिकेची स्वतःची बस सेवा अस्तित्वात नाही आहे. तब्बल दहा कोटी रुपये खर्च करून फक्त ३८ बसथांबे पालिका हद्दीत उभारण्यात आले. याऐवजी पनवेल महानगरपालिकेने स्वतःची परिवहन सेवा सुरू करणे गरजेचे होते. मात्र, तसे न करता बस थांब्यावर दहा कोटी रुपये खर्च करण्यात आला.

पनवेल पालिकेकडून यासाठी शासकीय निधी प्राप्त झाला होता, असे सांगण्यात आले. मात्र, हा शासकीय निधी इतर ठिकाणीदेखील वापरता आला असता. मात्र, ३८ बसथांब्यावर त्यांची उधळपट्टी करण्यात आली. बसथांबे जरी आकर्षक दिसत असले तरीदेखील ते खराब होण्याचीच भीती जास्त आहे.

> पनवेल महानगरपालिकेने जीएसटीसह दहा कोटी सत्तावीस लाख रुपये खर्च करून पालिका हद्दीत अडतीस बसथांबे उभारले. मात्र, स्वतःची परिवहन सेवा पालिकेला सुरू करता आली नाही. हे पालिकेचे अपयश आहे. पनवेल पालिकेकडून नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी सुरू आहे. - आदित्य जानोरकर, महाराष्ट्र प्रदेश युवक, शरद पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव व टेंडर क्रमांक** – रत्नागिरी विभागातील ट्रॅक्शन सबस्टेशनमध्ये बसविण्यात आलेल्या न्यूमेरिकल रिलेजचे दोन वर्षांसाठी वार्षिक परीक्षण व कॅलिब्रेशन करणे **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/14/2025 दिनांक 05.12.2025, अंदाजित खर्च** – ₹ 30,43,600/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 60,900/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 26/12/2025 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल मोहम्मद हनीफ मुत्तलीब सय्यद वगैरे ५ यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **श्री. शरद रामचंद्र परांजपे वगैरे ५** यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २३५ | ८ | ०-१८-००<br>पो.ख. ०-०२-०० | ०-१९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०९/१२/२०२५.
**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता-शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड मो. - ९३२५०६००३७.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, मौजे- कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ३५/२,क्षेत्र ०-८२-०० हे.आर, पो.ख. ०-१८-१० हे.आर., एकूण क्षेत्र १-००-१० हे. आर., आकार २०.६९ रू. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-०० हे.आर., तसेच सदरहु मिळकतीत जाण्यायेण्याकरीता मौजे कावीर गट नं. ३५/१ या मिळकतीमधुन पुर्व पश्चिम ६ मीटर रूंदीचा सामाईक रस्त्याच्या हक्कांगासह ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. श्रीकांत नथोबा नाईक, रा. मु. काविर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०८/१२/२०२५
**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**जाहीर नोटीस** दि.०८/१२/२०२५

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिल श्री. दिनेश कचरु बल्हाळ, रा. प्लॉट नं. २२/२३, गणपती मंदिर बाजुला, जिल्हा परिषद शाळेच्या जवळ, लाभ नगर, तरोडा खु.,मालेगाव रोड, नांदेड, महाराष्ट्र ४३१६०५ यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा सदरच्या व्यवहाराची बोलणी व बयाणा पावती विद्यमान मालक सॅविओ डॉमिनिक रॉड्रीक्स यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरुड | २५८ | ०-३५-६०<br>पो. ख ०-०६-४०<br>एकुण ०-४२-०० | ३.५० |

वरील मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. भक्ती दिलीप पाटील**
रा. मु. पो. मोठे शहापुर,.
ता अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.८३८०८९३५५१

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीम. अमिता विक्रम शहा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | ३५ | ०-२५-००<br>०-०६-१०<br>०-३१-१०<br>पो. ख. ०-०१-३०<br>०-३२-४० | ७.५० |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०९/१२/२०२५
**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, मौजे- खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. ४१, एकूण क्षेत्र ००-५२-७० हे. आर., आकार ८.३२ रू.पै., पैकी क्षेत्र ०-२६-३० हे. आर., आकार ४.१५ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक रामकृष्ण जोमा पाटील रा. मु. खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०८/१२/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण
आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. ६१/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक २०/११/२०२५ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक कृषिवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | नागोठणे औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नागोठणे येथील शुद्ध जलउदंचन केंद्रामध्ये सेल्फ लेव्हलिंग नॅनो तंत्रज्ञानावर आधारित ईएसडी एनएफ इन्सुलेशन प्रक्रिया करून फ्लोअरिंगचे मजबूतीकरण करणे. | ₹२९,१०,१७०.०० |
| २. | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... नागोठणे व पोयनाड येथे दोन कॅलेंडर वर्षांसाठी डिझेलवर चालणाऱ्या जनरेटिंग सेटची मासिक सर्व्हिसिंग, किरकोळ बिघाड व नियतकालिक प्रतिबंधात्मक देखभाल करणे. | ₹२७,९२,६५४.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १८/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# पनवेल - कर्जत रेल्वे मार्ग अंतिम टप्प्यात

**2800 कोटींचा खर्च**

**प्रवाशांचा रेल्वे प्रवास होणार अधिक सुलभ**

| नेरळ | प्रतिनिधी |


कर्जत येथून पनवेलकडे जाण्यासाठी २००६ मध्ये मार्ग तयार झाला आणि त्या मार्गवरून प्रथम अलावाहू आणि नंतर प्रवासी वाहतूक सुरु झाली. मात्र कर्जत पनवेल मार्गावर उपनगरीय लोकल सेवा सुरु होण्यात अडचणी येत होत्या. शेवटी मध्य रेल्वेकडून ट्रान्स हार्बर रेल्वे मार्ग निर्माण करण्याचा निर्णय घेतला आणि कर्जत पनवेल मार्गावर चौक ते कर्जत असा वेगळा मार्ग बनवण्यात आला. या नवीन मार्गावर दुहेरी मार्गिका टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नवी मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध असून कर्जत पनवेल मार्गावर उपनगरीय लोकल सेवा सुरु होणार त्यावेळी हा मार्ग प्रवासी वर्गासाठी सुलभ मार्ग समजला जाऊ शकतो.

रेल्वेमंत्री म्हणून मधू दंडवते यांनी कोकण मार्ग तयार करीत असताना कर्जत पनवेल मार्गाला मंजुरी दिली होती. मात्र त्यावेळी कर्जत पनवेल मार्ग एकेरी बनविण्यात आला आणि त्यात या मार्गावर असलेल्या हालिवली वावर्ले बोगद्यातील दगडाचे मूल्य हे भुसभुशीत दगड अशा स्वरूपातील असल्याने त्या मार्गावर मागील २० वर्षात एकदाही उपनगरीय लोकल चालविली गेली नाही. तर मालवाहू आणि एक्स्प्रेस गाड्या यांच्यासाठी हा एकेरी मार्ग वापरात आहे. नवी मुंबई येथील औद्योगिक नगरीत नोकरीसाठी जाणारे नोकरदार यांच्याकडून सातत्याने उपनगरीय लोकलची मागणी होत होती. शेवटी २०२१ मध्ये रेल्वेकडून कर्जत पनवेल मार्गावरील चौक पासून कर्जत असा नवीन मार्ग आणि पनवेल कर्जत या मार्गावर दुपदरी मार्गिका टाकण्याच्या कामाला मंजुरी मिळाली होती. कर्जत आणि पनवेल दरम्यान दुहेरी रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाचे काम जानेवारी २०२१ मध्ये सुरू झाले. कोरोना महामारीमुळे सुरुवातीला या कामात अडथळा आला. मात्र नंतर या २९.६ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू झाले.

मुंबई रेल्वे कॉर्पोरेशनकडून मागील पाच वर्षांत या प्रकल्पाचे ८० टक्के काम केले आहे. या मार्गावर पनवेल, मोहोपे, चिखले, चौक आणि कर्जत अशी पाच रेल्वे स्थानके आहेत. या सर्व स्थानकांची कामेही अंतिम टप्प्यात आहेत. कर्जत-पनवेल या रेल्वे मार्गाच्या डबलिंगचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लोहमार्ग, तीन बोगदे, ४४ लहानमोठे पूल आणि १५ भूयारी मार्गिका यांचे काम सुमारे ८० टक्के पूर्ण झाले आहे. उरलेले २० टक्के काम लवकरात लवकर पूर्ण करून मार्च २०२६ पासून या मार्गावरून लोकल चालवण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे. प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी या मार्गावर येत्या फेब्रुवारीमध्ये सीआरएसची चाचण्या होणार आहेत. हा मार्ग सुरू झाल्यानंतर कर्जत पनवेल प्रवास सुसाट होणार असून कर्जत ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल या प्रवासाचा कालावधी व्हाया पनवेलमार्गे ३० मिनिटांनी कमी होणार आहे. कर्जत-पनवेल दरम्यान दुहेरी मार्गावर रेल्वे सेवा सुरू झाल्यानंतर लोकल सेवेचा वेग वाढणार आहे. सध्या या मार्गावर प्रवासी गाड्यांची संख्या कमी आहे. मालवाहतूक करणाऱ्या गाड्या मोठ्या प्रमाणात चालवल्या जातात. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते कर्जत या प्रवासासाठी जलद लोकलने दोन तासांचा तर धीम्या लोकलने अडीच तासांचा कालावधी लागतो. कर्जत पनवेल दुहेरी मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांसाठी व्हाया पनवेल या प्रवासासाठी ३० मिनिटांचा प्रवास कमी होणार आहे.

### उपनगरीय रेल्वे सेवेत सर्वात लांब बोगदा

कर्जत-पनवेल रेल्वे मार्गावर मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून वावर्ले, नढाल आणि किरवली या तीन ठिकाणी तीन बोगदे तयार केले आहेत. त्यापैकी वावर्ले बोगद्याची लांबी ही पावणेतीन किलोमीटर म्हणजे २७०० मीटर एवढी आहे. हा किरवली येथील बोगदा मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेत सर्वात मोठा ठरला आहे. यापूर्वी मध्य रेल्वेच्या ठाणे आणि दिवा स्थानकादरम्यान असलेला पारसिक बोगदा सर्वाधिक लांब म्हणून ओळखला जात होता. या बोगद्याची लांबी १ हजार ३०० मीटर आहे. कर्जत-पनवेल मार्गावरील नढाल बोगद्याची लांबी २१९ मीटर तर किरवली येथील दुसऱ्या बोगद्याची लांबी ३०० मीटर इतकी आहे.



## महड येथे रांगोळीतून साकारले महाभारत

- **रंगछंद कलाकार व सहरंग कला अकादमीची संकल्पना**
- **३० तासात २५ कलाकारांनी काढली रांगोळी**

| पाताळगंगा | प्रतिनिधी |



अष्टविनायकापैकी एक असेलेले महड वरद विनायकांचे दर्शन घेण्यासाठी खालापूर, चौक, खोपोली, कर्जत, पनवेल, रसायनी या परिसरातील हजारो भक्त आपल्या लाडक्या वरद विनायकाचे दर्शन घेण्यास सुरुवात झाली. संकष्टी चतुर्थी निमित्ताने महाभारत या विषयावर सुंदर अशी मनमोहक रांगोळी रंगछंद मंडळ अध्यक्ष रोशन पाटील व सहरंग कला अकादमी, कलाशिक्षिका श्रावणी पाटील यांच्या संकल्पनेतून काढण्यात आली.

ही रांगोळी काढण्यासाठी ३५ किलो रांगोळीचा वापर करण्यात आला. तसेच ह्या रांगोळीसाठी ३० तास एवढा कालावधी लागला असून, ही रांगोळी १०/३० फुट असून यामध्ये सप्तरंगांचा वापर करण्यात आला. त्याच बरोबर २५ कलाकारांनी एकत्र येऊन ही भव्यदिव्य अशी रांगोळी साकारण्यात आली आहे.

ही रांगोळी रोशन पाटील, अश्विनी सरदार, शुभम कुमरे, योगेश डाकी, रोहित भोईर, मधुरा भोईर, मिताली सुर्वे, रवी चौधरी, अमोल खणावकर, जय भोईर, यशोदीप पाटील, गीतेश पाटील, शैलेश पाटील, अजित मिटकरी, अंकित गोजे, नम्रता गोंधळी, सरोज पाटील, आकांक्षा भगत, हेतल म्हात्रे, पद्मिनी खाडे, मोहिनी विशे, पूजा कदम, अरुण काळोखे, मनोहर ठाकूर, ज्योती पाटील, ज्योती म्हात्रे, सुयोग म्हसकर, हर्ष क्षीरसागर आदींनी मेहनत घेतली.

## नागपूर येथे समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन



| कोर्लई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करून कायम करण्याची शिफारस करावी, यासह प्रलंबित मागण्यांसाठी सिंहगड रस्ता परिसरासह सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे.

समग्र शिक्षा योजनेतील ३५००कर्मचारी कंत्राटी स्वरूपात गेले वीस वर्ष आपले शिक्षणाचे योगदान देत आहेत आणि तुटपुंजा मानधनावर काम करत आहेत आज पर्यंत शासनाने फक्त आश्वासनच दिले परंतु त्यांना नियमित केले नाही. जिल्हा परिषदेमध्ये दहा वर्षे काम केल्यानंतर नियमित केले जाते त्यांच्या नियुक्ती सरपंचांच्या अधिकारात असतात. वनखात्यात तात्पुरते घेतलेले कर्मचारी नियमित केले एवढेच नव्हे तर शासनाने आमच्या समग्र शिक्षा योजनेमधील अर्ध्या कर्मचाऱ्यांना नियमित केले आणि आमच्यावर मात्र अन्याय होत आहे त्यासाठी तीन हजार पाचशे कर्मचाऱ्यांनी नागपूर येथे आंदोलन आणि उपोषणाला सुरुवात केली असल्याची माहिती राज्याचे सल्लागार विश्वनाथ म्हात्रे यांनी दिली.

## कामत येथे श्वान दंशाने गुरे दगावली

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

कामत या ग्रामीण भागामध्ये पिसाळलेला कुत्रा गुरांना चावल्यामुळे चार गुर दगावल्याची घटना घडली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की कामत परिसरामध्ये पिसाळलेल्या कुत्र्याने मोकाट गुरांना चावा घेतल्यामुळे चार गुर दगावली असून त्यामध्ये दोन गाई व बैलांचा समावेश आहे. सुतारवाडी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नव्यानेच रुजू झालेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत माळी यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासणी केली असता या प्राण्यांचा मृत्यू पिसाळलेला कुत्रा चावल्याने झाल्याचे निदर्शनास आले. एका एका गाईच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक असल्याचे ऑपरेशननंतर निदर्शनात आले. डॉ. चौकशी केली असता ही गुरे मोकाट असल्याचे समजले.

## महिला बेपत्ता

| उरण | प्रतिनिधी |

चिरनेर गावामधून ३० वर्षाची विवाहित महिला घरात कुणासही काही न सांगता अचानकपणे बेपत्ता झाल्याने परिसरात चर्चेचा विषय झाला आहे. याबाबत उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. चिरनेर येथील सुधीर याच्या चाळीत ही विवाहित महिला आपल्या पतीसह वास्तव्यास होती. बेपत्ता असणाऱ्या महिलेचे पूर्ण नाव सवनाबाई हिंदकुमार कुशवाह असून तिची उंची १४५ सेंटी मीटर, रंग गोरा,मजबूत बांधा,नाक सरळ,केस विरळ,डोळे काळे, गोल चेहरा, उजव्या हातावर सवाना असे नाव गोंदवले आहे. तालुका उरण-गाव चिरनेर येथील सुधीर याच्या चाळीत तिचे सध्याचे वास्तव्य आहे. तरुणीचा शोध वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस घेत आहेत.

## पुण्यस्मरणानिमित्त अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न

| भाकरवड | वार्ताहर |



अलिबाग तालुक्यातील देहेन गावचे रहिवासी रायगड भूषण निष्ठावंत वारकरी वैकुंठवासी विद्याधर निलकर यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त त्रिदिनी श्री ज्ञानेश्वरी पारायण, नववा अध्याय, बारावा अध्याय व पंधरावा अध्याय, किर्तन, प्रवचन, सोहळा ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर या वेळी करण्यात आले होते.

या तीन दिवसीय कार्यक्रमात ध्वजारोहण प्रतिमापूजन, विणा, मृदुंग, टाळ पूजन, ग्रंथ पूजन कलश पूजन ज्ञानेश्वरी पारायण सायंकाळी ४ ते ५ या वेळेत जगन्नाथ राऊत देहेन यांचे प्रवचन सायंकाळी साडेपाच ते साडेसहा सामुदायिक हरिपाठ, राजमाता वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी देवाची आळंदी शिवानी शिंदे, रडू नको बाळा फेम गायिका देवाची आळंदी, रात्री सात ते नऊ सुदाम हिंगे आळंदी देवाची यांचे कीर्तन श्री हनुमान प्रसादिक भजन मंडळ धेरड यांचे हरिजागर दुसऱ्या दिवशी ५ ते ७ काकडा, ७ ते ९ विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण पद्माकर म्हात्रे तळाशेत यांचे प्रवचन, कीर्तन सेवा सात ते नऊ शिवशाहीर अमित बळवली पेण, साडेपाच ते साडेसहा हरिपाठ सामुदायिक, दिवस तिसरा काकडा, श्रीमद् भागवत गीता प्रार्थना, नववा बारावा पंधरावा अध्याय तसेच परम पूज्य वडिलांच्या वर्षश्राद्धाचे दर्पण पूजन सकाळी दहा ते बारा पुष्प वृष्टी व काल्याचे किर्तन हरिभक्त पारायण गोविंद शेलार श्री क्षेत्र त्रंबकेश्वर नाशिक, भजन सेवा अभय राम संन्यासाश्रम डोळवी बुवा एकनाथ महाराज, बहिरेश्वर प्रासादिक भजन मंडळ मानी अजित यांचे तर या कार्यक्रमासाठी सहभाग व सहकार्य अलिबाग व पेण तालुक्यातील हरिपाठ मंडळ, भजन मंडळ, महिला मंडळ ग्रामस्थ, व्यवस्थापक ग्रामस्थ मंडळ देहेन, शिवज्योत प्रतिष्ठान देहेन यांनी भाविक भक्तांसाठी अल्पोपहार भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## संगीत के सप्तरंग कार्यक्रमाने रसिकश्रोते मंत्रमुग्ध

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण उत्कर्ष समितीचे संस्थापक-अध्यक्ष गोपाळ पाटील निर्मित संगीत के सप्तरंग हा हिंदी गाण्यांचा ऑकेस्ट्रा उलवे येथे सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी महेंद्र घरत यांनी स्थानिक कलाकारांना संधी मिळावी, यासाठी मी आग्रही असतो. कलाकारांना सहकार्य करण्याची माझी भूमिका कायम आहे. गोपाळ पाटील हे उत्कृष्ट कबड्डीपटू, धावपटू आहेतच. परंतु त्याचबरोबर त्यांनी अनेक मराठी नाटकांतून अभिनय साकारला आहे. त्यांच्या भारदस्त आवाजामुळे त्यांनी संगीत क्षेत्रात घेतलेली उडी कौतुकास्पद आहे, असे गौरोद्गार महेंद्र घरत यांनी काढले.

या संगीत मैफलीची सुरुवात धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहून झाली. त्यानंतर पूर्णिमा चित्रपटातील धर्मेंद्र आणि मिना कुमारी यांच्यावर चित्रित झालेल्या हमसफर हम मेरे हम सफर या गोपाळ पाटील व आकांक्षा भोईर यांनी गायलेल्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संगीत मैफलीतील कलाकार उमंग गोस्वामी, दक्षता स्वरूप, आकांक्षा भोईर, संगीता डे, महेंद्र कारले, राजा भोसले, राहील शेख, रवि नाईक यांच्या समुधर आवाजाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.

यावेळी कॉ. भूषण पाटील, रवि पाटील, नरसू पाटील, ॲड. डी. के. पाटील, नरेश रहाळकर, सुधाकर पाटील, विकास नाईक, सदानंद गायकवाड, कृष्णा बा. पाटील, भाऊशेठ पाटील, शरद ठाकूर, मिलिंद पाडगावकर आदी मान्यवरांनी आनंद घेतला.

**बोर्लीपंचतन ग्रामस्थांची गैरसोय** | **जलवाहिन्या जागोजागी फुटलेल्या**

## जीर्ण जलवाहिन्यांचा पाणीपुरवठ्याला फटका

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |





बोर्लीपंचतन गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या कोंढे पंचतन धरणातील पाणीसाठा संपल्यावर गावाला कार्ले धरणातून पाणीपुरवठा केला जातो. परंतु या योजनेतील जलवाहिन्या सुद्धा जागोजागी फुटल्यामुळे त्याचा पाणीपुरवठ्यावर परिणाम होत आहे.

गावाला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी ग्रामपंचायतीचे प्रशासक किशोर नागे, अधिकारी शंकर मयेकर हे रात्रंदिवस जातीने उपस्थित राहून जागोजागी फुटलेल्या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने करून घेत आहेत. जुन्या आणि जीर्ण झालेल्या जलवाहिन्यांमुळे वारंवार हे काम वाढतच असल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. बोर्ली पंचतन गावाच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यामध्ये पाण्याची समस्या अधिकच गंभीर होऊ शकते.यासाठी गावाला कायम सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी एका मोठ्या पाणीपुरवठा योजनेची आवश्यकता आहे.

> **वारंवार फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे त्याचा पाणी पुरवठ्यावर परिणाम होत असून पाणी टंचाईमुळे ग्रामस्थांची गैरसोय होते.गावासाठी मंजूर झालेल्या जलजीवन मिशनचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करावे.**
> **-कुणाल पेडणेकर,ग्रामस्थ बोर्लीपंचतन.**

> **जुन्या झालेल्या जलवाहिन्या वारंवार फुटत असल्याने त्याच्या दुरुस्तीचा मोठा आर्थिक भार ग्रामपंचायतीवर पडत आहे. वारंवार फुटणाऱ्या जल वाहिन्यांमुळे ग्रामस्थांची गैरसोय होते त्यामुळे या जुन्या जलवाहिन्या बदलणे गरजेचे आहे.जलजीवन मिशनच्या कामाचा पाठपुरावा चालू असून ते लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी मी व ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर प्रयत्नशील आहोत.**
> **-किशोर नागे,प्रशासक ग्रामपंचायत बोर्लीपंचतन.**

## ‘पाण्याच्या टाकीसाठी भूखंड मिळावा’

**पनवेल :** तळोजा एमआयडीसी परिसरामध्ये तोंडरे, नागझरी, पढगा आणि डोंगऱ्याचा पाडा हे गावे एमआयडीसी परिसरात येत असून येथील नागरिकांना पाण्याचा खूप मोठा तुटवडा जाणवत आहे. येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे. यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. म्हणून या नागरिकांसाठी तळोजा एमआयडीसी परिसरामध्ये पाण्याची टाकी बांधण्यासाठी भूखंड मिळावा., अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी केली आहे. पनवेल जवळील तलोजा एमआयडीसी हा एरिया मोठमोठ्या कंपन्यांनी व्यापलेला आहे. यामध्ये दीपक फर्टीलायझर, हार्डिलिया, आलाना, अशियेन पेंट्स, आदी मोठ्या कंपन्या आहेत.

## निवडक



### आदीवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप

**रसायनी :** भारतीबेन रमणीकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सहा आदिवासी वाड्यांवर ब्लँकेटचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी दुधनी, खेमवाडी, घोडगाव, भाग्याची वाडी, ताडगाव आदी वाड्यांवरील एक हजार उबदार ब्लँकेटचे वाटप भारतीबेन रमणीकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने ट्रस्टी शैलेश शहा,रंजना शहा यांनी केले. यावेळी राकेश चव्हाण, प्रतिमा ललान, दत्तगुरु सामाजिक मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते. डोंगर माथ्यावर राहणाऱ्या आदीवासी बांधवांना ऐन थंडीत मोफत उबदार ब्लँकेट मिळाल्याने त्यांनी भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टचे आभार मानले.



### ‘सकल मराठा भवन’ चे भव्य उद्घाटन

**खांदा :** वसाहत परिसरातील सकल मराठा भवनचे उद्घाटन मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते मनोज जरंगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी मराठा समाजाच्या हक्क, एकजुटी आणि प्रगतीविषयी मार्गदर्शन करत उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाला मराठा समाज बांधवांसह परिसरातील नागरिक, महिला वर्ग आणि विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळा उत्साहात आणि अनुशासनपूर्ण वातावरणात पार पडला.



### पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न!

**मुंबई :** सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लिहिलेल्या आणि अर्थतज्ञ विश्वास उटगी यांची प्रस्तावना लाभलेल्या बँकिंग तज्ञ मधु सदाशिव शिरोडकर लिखित सहकारी बँकांना झाले आहे तरी काय? या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच डीसीबी बँकेच्या वरिष्ठ अधिकारी पल्लवी बेळणेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

### रातवड विद्यालयात आदरांजली

**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून करण्यात आली. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय, शिक्षणाचे महत्व, संविधान निर्मिती आणि समानता या विषयांवर प्रभावी मांडणी करत प्रबोधनात्मक भाषणे दिली.शिक्षक भिवा पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बाबासाहेबांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठीचे महत्व सांगितले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळाला.कार्यक्रमात श्रुती मोरे हिने सादर केलेल्या नृत्याने सर्वांची मने जिंकली. तिच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला सांस्कृतिक स्पर्श मिळाला.महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधत विद्यालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, समता आणि सामाजिक बांधिलकी यांची जाणीव अधिक दृढ झाली.

### ‘पिढी वाचवायची असेल तर मुलांना मैदानावर आणा!’

**खोपोली :** चार भिंतीत अडकलेलं बालपण आणि मोबाईलच्या स्क्रीनवर चालणारे आभासी खेळ ही आजच्या पिढीसाठी धोक्याची घंटा आहे. मोबाइल गेमच्या व्यसनामुळे मुले एकलकोंडी, तणावग्रस्त होत आहेत. हे चक्र थांबवायचे असेल तर मैदानच त्यांची लाइफलाईन ठरली पाहिजे, असा वास्तववादी संदेश खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी दिला. मंडळाच्या एकत्रित क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. मैदानावर विद्यार्थ्यांची आणि क्रीडा प्रेमींची खूप मोठी उपस्थिती होती. यावेळी मंचावर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल आणि पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, संचालक दिनेश गुरव, दिलीप पोरवाल, भास्कर लांडगे, विजय चुरी, प्राचार्य के.एम. गोरे, प्रशांत माने, वर्षा घारे,डॉ. गौरव तिवारी, मुख्याध्यापिका जान्सी ऑगस्टीन, समिक्षा ढोके,तसेच शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षणाच्या स्पर्धेत पाल्यांना आपण मैदानापासून दूर खेचतो आणि त्यांची पावलं मोबाईल गेमकडे वळतात. मोबाईल स्क्रीनवरील विजय खरा नसतो, पण त्यातून निर्माण होणारा ताण मात्र खरा असतो! पालकांनी मुलांना मैदानावर खेळायला प्रोत्साहन देणं हीच खरी गुंतवणूक आहे. त्यांनी मंडळाने साधारण कुटुंबातील मुलांसाठी दर्जेदार व परवडणारे शिक्षण उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष कौतुक केले.उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी खेळ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला धार लावतो. टीमवर्कची जाणीव, शिस्त, आत्मविश्वास, खिलाडू वृत्ती आणि पराभव स्वीकारण्याची ताकद हे गुण फक्त मैदानावरच शिकता येतात. इथूनच अधिकारी, नेते आणि सजग नागरिक घडतात, असे प्रतिपादन करत मंडळाने शिक्षणाची पंढरी उभारल्याबद्दल त्यांनी अध्यक्ष संतोष जंगम आणि संचालक मंडळाचे मनापासून कौतुक केले.

# जीव घेणारे सरकार

फडणवीस सरकार झाडांचा जीव घेणारे सरकार आहे. नाशिकला कुंभमेळ्यासाठी हजारो झाडे कापली जाणार हे आता स्पष्ट झाले आहे. यापूर्वी समृध्दी महामार्गासाठी शेकडो झाडे कापण्यात आली. तिकडे गडचिरोलीचा विकास करण्याच्या नावाखाली जंगलच्या जंगल साफ करण्यात आले. अदानी तसेच इतरांना खाणी तसेच इतर उद्योग काढण्यासाठी जी परवानगी दिली जात आहे ती झाडांच्या मुळावर उठणारी आहे. मुंबईमध्ये आरे कॉलनीत मेट्रोचे यार्ड करण्याला याच कारणासाठी लोकांचा विरोध होता. त्यांनी ते कांजूरमार्गला नेण्याचा प्रयत्न केला. तिथे जमिनीच्या परवानगीमध्ये जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करून मोदी सरकारने ते होऊ दिले गेले नाही. ठाकरे सरकार पडल्यावर पहिला एकनाथ शिंदे यांनी पहिला निर्णय घेतला तो कारशेड किंवा यार्ड आरे कॉलनीमध्ये हलवण्याचा आरे कॉलनी हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचाच भाग आहे. तिथे रेल्वेचे यार्ड केल्याने शेकडो झाडांची कत्तल होणार होती. त्याला पर्यावरणप्रेमी व सामान्य नागरिकांनी कसून विरोध केला. त्यांना नक्षलवादी ठरवण्यात आले. पोलिसी गुंडगिरीच्या बळावर निर्णय रेटून नेण्यात आला. प्रकरण न्यायालयात असताना रातोरात झाडे कापण्यात आली. हा उघडच बिल्डर लॉबीच्या फायद्याचा निर्णय होता. त्यामुळेच फडणवीस सरकारला त्यात इतका रस होता. तेथील झाडांचे पुन्हा रोपण करण्यात येईल अशी थाप मारण्यात आली. मात्र त्यातील किती झाडे जगली हा संशोधनाचा विषय आहे. नाशिकला कुंभमेळ्यासाठी तपोवनातून झाडे साफ करून तेथे हळूहळू बिल्डरांचा प्रवेश व्हावा अशा हालचाली सुरू आहेत. नाशिकमध्ये कित्येक वर्षांपासून कुंभमेळा होत आलेला आहे. मात्र यापूर्वी कधीही इतक्या प्रमाणात झाडे कापण्याची गरज भासलेली नव्हती. पण फडणवीस सरकारची नजर यांच्यावर गेली आणि त्यांचे दिवस भरले. रायगडप्रमाणेच नाशिकचा पालकमंत्री ठरवण्यात आलेला नाही. त्याऐवजी फडणवीसांचे उजवे हात गिरीश महाजन यांच्यावर सर्व जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकचा तथाकथित आणि बिल्डरांचा खरा विकास घडवून आणण्यात ते उपयोगी पडतील असे दिसते.

## साधू नव्हे हे भोंदू

कुंभमेळ्याला येणारे साधू तपोवनात राहतात. अनेकांचे तेथे कायमचे आश्रम आहेत. हे साधू काय करतात, त्यांच्या आध्यात्मिक चिंतनाचा समाजाला किंवा कोणालाही नेमका काय उपयोग होतो, या साधूंकडे पैसा कोठून येतो हा एकदमच स्वतंत्र विषय आहे. अनेक साधू गांजेकस असल्याचा आरोप होतो. शिवाय साधना, तप करतात म्हणावे तर त्यांचे मोह, मत्सर, रागलोभ सामान्य माणसांहूनही भयंकर असतात. कुंभस्नानाच्या वेळी आंघोळीचा पहिला मान कोणाचा यावरून वेगवेगळ्या आखाड्यांच्या साधूंमध्ये हाणामाऱ्या होतात. एरवीही जनतेला यांचा उपद्रव होत असतो. तरीही धर्माचा विषय आला की माणसे गप्प राहतात. मोदी सरकारच्या काळात तर लोकांना गप्प करण्यासाठी मुद्दाम धार्मिक मुद्दे काढले जातात. कुंभमेळ्यात भयानक घाण, गर्दी, रेटारेटी, अपघात होत असतात. तरीही त्यात मोठे आध्यात्मिक समाधान वा पुण्य मिळते असे अंधभक्त हिंदू मानतात. हा त्यांच्या श्रध्देचा विषय आहे असे सांगून सगळे वाद बंद केले जातात. तपोवनातील झाडांच्या कत्तलीचा विषयही असाच रेटता येईल असे महाजन, फडणवीस आणि कंपनीला वाटत होते. पण त्यांचा अंदाज चुकला. इथली १८०० झाडे कापली जाणार असे म्हटल्यावर तमाम सर्व नाशिककर संतप्त झाले. यात भाजपचे मतदार असलेले मध्यमवर्गीय आणि इतरही लोक होते. त्यांना सयाजी शिंदे यांच्यासारख्या कलाकारांची साथ मिळाली. मिडियानेही हा विषय उचलून धरला. तरीही या वादामागे अर्बन नक्षलवादी आहेत असे सांगून त्याला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न फडणवीसांनी केलाच. शिवाय, प्रकरणाला हिंदू विरुध्द मुस्लिम असा रंग देण्यासाठी नेहमीप्रमाणे नितेश राणे यांना उतरवण्यात आले. ईदला बकऱ्यांची कत्तल हीदेखील पर्यावरणाला घातक आहे असे सांगण्याचा मूर्ख प्रयत्न त्यांनी केला. तो अर्थातच त्यांच्या अंगावर उलटला. सोशल मिडियातूनही विरोधक हे हिंदू धर्मविरोधी आहेत अशा पोस्टींचा पाऊस पाडण्यात आला. पण या कशाचाही परिणाम झाला नाही. साधू नाही आले तरी फरक पडत नाही, पण झाडे तोडू देणारनाही अशी भूमिका सयाजी शिंदे यांनी मांडली व तिलाही जनतेतून उस्फूर्त पाठिंबा मिळाला.

## चलाखी अंगाशी आली

या दरम्यान, महाजन व फडणवीस हे नेहमीप्रमाणे जनतेला वेडे बनवण्याचा प्रयत्न करीत होते. ही झाडे म्हणजे मोठे वृक्ष नसून बाभळीची झाडे तसेच घाणेरी किंवा तत्सम झुडपे आहेत असे ते आधी म्हणत होते. १८०० झाडे कापणार हे खोटे आहे असे म्हणत होते. पण महापालिकेने जी झाडे तोडायचे त्यांच्यावर आधीच मार्किंग करून झाले होते. त्यामुळे तो खोटेपणा उघडा पडला. पण आम्ही १५ हजार नवी झाडे लावणार आहोत असे महाजन सांगू लागले. याचाच अर्थ तुम्ही १८०० झाडे तोडणार आहात असे म्हणून लोकांनी त्यांच्यावर बाजू उलटवली. आता या विरोधकांच्या आंदोलनाला चांगलीच गती आली असून कलाकार, कवी, कार्यकर्ते रोज तपोवनात जमून जागर करीत आहेत. त्यामुळे सरकारला आपला कार्यक्रम रेटणे सोपे राहणार नाही. अर्थात, आरे कॉलनीत अशाच रीतीने बरेच दिवस आंदोलन चालले व नंतर प्रकरण कोर्टात गेले आहे व स्थगिती नाही अशा संधीचा फायदा घेऊन सरकारने झाडे कापली होती. तसाच काही डाव येथेही टाकला जाण्याची शक्यता आहे. त्याबाबत आंदोलकांना सावध राहावे लागेल. हे सरकार झाडांचे खून करण्यात सराईत झाले असून आता तर ते अशा कत्तली करायला चटावले आहे. हिंदू संस्कृतीमध्ये सर्व झाडांना देव मानण्यात येते. आणि हे धर्माचे नाव घेऊन कारभार करणारे सरकार त्यांचा खून करू पाहत आहे. मोदी व फडणवीसांच्या आंधळ्या भक्तांना आता तरी यांच्या चेहऱ्याची ओळख पटेल अशी आशा आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराजचा कुंभमेळा गंगेच्या विस्तीर्ण पात्रानजीक भरतो. त्याच्यासाठी भरपूर जागा उपलब्ध आहे. तरीही तेथे प्रचंड घाण व अपघात होतात. नाशिकचा परिसर तर तुलनेने छोटा आहे. कुंभमेळ्याच्या काळात नाशिकमधून आणि आषाढी-कार्तिकी यात्रेच्या काळात पंढरपुरातून अनेक मूळचे रहिवासी पळून बाहेर जातात. तेथील अस्वच्छता, गैरसोयी या सहन करण्याच्या पलिकडे आहेत असे त्यांना वाटते. प्राचीन काळी लोकसंख्या कमी होती व जागा भरपूर होती तेव्हा असे कुंभमेळे भरवणे ठीक होते. पण आता त्यांच्या बाबत फेरविचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. नाशिकची गोदावरी आधीच प्रदूषित आहे. त्यात या गर्दीची भर पडली की हे प्रदूषण कळसाला पोचते. त्यातच आता फडणवीस आणि मंडळी झाडे तोडणे वगैरे उद्योग करून पुरती वाट लावणार आहेत. यांना त्यांच्या भक्तांनीच एकदा सणसणीत धडा शिकवण्याची गरज आहे.

**विचार**

# कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी संघर्ष

***कर्नाटकमध्ये सत्ताधारी काँग्रेस पक्षात सर्व काही ठीक नाही. अलिकडेच सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार या दोन वरिष्ठ पक्षनेत्यांमध्ये पुन्हा एकदा संघर्ष उफाळून आला. सिद्धरामय्या यांना सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रम करायचा आहे, तर शिवकुमार हे मुख्यमंत्री होण्यासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. त्यामुळे कर्नाटकमधील राजकारण ढवळून निघत आहे. ही भाजपासाठी संधी तर ठरणार नाही ना?***



**राही भिडे**

गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस पक्ष कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या यांच्या जागी शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवणार की नाही याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. दोन्ही नेत्यांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्रिपद वाटप करण्याच्या सूत्रावर पक्षाने सहमती दर्शवल्याचीही चर्चा आहे. सत्तावाटप कराराबाबत काँग्रेस मौन बाळगून आहे; परंतु दोन्ही नेत्यांचे समर्थक याबाबत दावे करत आहेत. यामुळे पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वापुढे पेच निर्माण झाला आहे. २० नोव्हेंबर रोजी सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षे पूर्ण केली. काँग्रेसच्या सूत्रांच्या हवाल्याने मिळालेल्या वृत्तानुसार, शिवकुमार यांना पुढील मुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्यासाठी पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वावर दबाव आणण्यासाठी किमान १५ आमदार आणि विधान परिषदेचे सुमारे एक डझन सदस्य दिल्लीत तळ ठोकून आहेत. दोन वर्षांपूर्वी २२४ सदस्यांच्या कर्नाटक विधानसभेत १३५ जागा जिंकून काँग्रेसने सत्ता मिळवली. त्या वेळी काँग्रेसचा हा एक महत्त्वाचा विजय ठरला होता. तथापि, पक्षाला योग्यरित्या आनंद साजरा करता येण्यापूर्वीच सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्रिपदावरून मतभेद निर्माण झाले. पक्षश्रेष्ठींनी त्या वेळी परिस्थिती नियंत्रणात आणली. तथापि, आता कर्नाटकमधील काँग्रेसचा डाव उघडकीस आल्यानंतर पक्षाला कडक इशारा द्यावा लागला असून आपल्या आमदारांना आणि नेत्यांना नेतृत्वाबद्दल सार्वजनिक वक्तव्य करण्यास मनाई करावी लागली आहे. शिवकुमार यांचे समर्थक दिल्लीमध्ये तळ ठोकून असताना, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपण मुख्यमंत्री कायम राहू, असा विश्वास व्यक्त केला. नेतृत्वबदल, मंत्रिमंडळात फेरबदल किंवा सरकार पुनर्रचना याबाबतचा निर्णय काँग्रेस पक्षश्रेष्ठी घेतील, असा सूर दोघांनी लावला.

पुढील अडीच वर्षेही मुख्यमंत्रिपदी कायम राहण्याच्या सिद्धरामय्या यांच्या विधानावर शिवकुमार यांनी त्यांचे अभिनंदन केले. अर्थात हे कुत्सितपणे होते, हे वेगळे सांगायला नको. सिद्धरामय्या मुख्यमंत्रिपद सोडण्याच्या मनःस्थितीत दिसत नाहीत. त्यांना वाटते, की पक्षनेतृत्व या मुद्द्यावर नेते आणि आमदारांना शांत करण्यासाठी त्यांच्या बाजूने काम करत आहे. ते सांगतात, की त्यांना आणि शिवकुमार यांना पक्षनेतृत्व जे काही सांगेल, ते स्वीकारावे लागेल. मुख्यमंत्रिपदी कायम राहण्याबाबत त्यांना पूर्ण आत्मविश्वास आहे. ते दिल्लीतील आमदारांच्या लॉबिंगला फार महत्त्व देत नाहीत. शिवकुमार मात्र आमदारांचा बचाव करताना म्हणतात, की आमदारांना आपल्या वरिष्ठ नेत्यांना भेटण्याचा अधिकार आहे. त्यांना कोणी थांबवू शकत नाही. शिवकुमार हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त होते. सिद्धरामय्या यांच्याशी त्यांना कोणत्याही विषयावर चर्चा करायची नाही. ते स्पष्टपणे सांगतात, की त्यांनी सर्व जबाबदारी वरिष्ठ नेतृत्वावर सोपवली आहे आणि मुख्यमंत्री तसेच आपण स्वतः पक्षश्रेष्ठींच्या आदेशाचे पालन करू. म्हणून आता हा विषय ते आणि पक्षश्रेष्ठींच्या दरम्यान आहे. दरम्यान, शिवकुमार यांनी पक्षात गटबाजी असल्याचे नाकारून, पक्षातील अंतर्गत कलहाबाबतच्या बातम्यांसाठी भाजपला जबाबदार धरले.

पक्षाचे राज्य प्रभारी आणि सरचिटणीस रणदीप सिंह सुरजेवाला यांनीही राज्य काँग्रेसमधील अंतर्गत कलहासाठी भाजपला जबाबदार धरले. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये त्यांनी सांगितले, की मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. दोघांनीही मान्य केले, की भाजप माध्यमांच्या एका गटाच्या सहकार्याने काँग्रेस आणि त्यांच्या सरकारला बदनाम करण्यासाठी मोहीम चालवत आहे. राजस्थानमध्ये अशोक गेहलोत आणि सचिन पायलट या दोन वरिष्ठ नेत्यांमधील वादामुळे राज्य काँग्रेसच्या हातून निसटले. कर्नाटक काँग्रेसमध्ये नेतृत्वावरून सुरू असलेल्या गोंधळामुळे राज्याच्या राजकारणात नवी उलथापालथ झाली आहे. कर्नाटक काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू असल्याच्या अटकळीदरम्यान, सिद्धरामय्या यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतली. त्यांनी सांगितले, की खर्गे यांनी सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपदावर राहून आगामी राज्य अर्थसंकल्पाची तयारी करण्याचे निर्देश दिले. दुसरीकडे, शिवकुमार यांचे समर्थक त्यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करत आहेत. अनेक आमदारांनीही कॅबिनेट मंत्री होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या गटात खळबळ उडाली आहे. तथापि, सिद्धरामय्या यांनी आता या सर्व बातम्या फेटाळून लावल्या आहेत. खर्गे यांची भेट घेतल्यानंतर सिद्धरामय्या म्हणाले, की आम्ही बंगळुरूसह कर्नाटकमधील आगामी नगरपालिका निवडणुकांवर चर्चा केली.

नेतृत्वबदल आणि आमदारांच्या दिल्ली दौऱ्याचा संदर्भ देताना सिद्धरामय्या म्हणाले, की ही फक्त एक अफवा होती. माध्यमांनी ही कथा रचली. मी आमदारांना ते दिल्लीला का गेले हे विचारले नाही. याबाबत मला काही जाणून घ्यायचे असेल, तर मी गुप्तचर विभागाकडून माहिती घेईन. आमदारांना दिल्लीला जाऊ द्या. शेवटी प्रत्येक नेता, मंत्री आणि अगदी शिवकुमार आणि मी पक्षाच्या पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाचे पालन केले पाहिजे. एकिकडे ही प्रांजळ मते ऐकायला मिळत असताना १५ हून अधिक काँग्रेस आमदारांनी नवी दिल्लीमध्ये खर्गे यांची भेट घेतली आणि शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्यासाठी दबाव आणला. सिद्धरामय्या यांनी नोव्हेंबरमध्ये अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. परिणामी, अनेक आमदार पुढील अडीच वर्षांसाठी शिवकुमार यांनी पक्षाचे नेतृत्व करावे, अशी मागणी करत आहेत. तथापि, काँग्रेसने संपूर्ण प्रकरणावर मौन बाळगले आहे. कर्नाटकमध्ये गेल्या काही काळापासून नेतृत्वबदलाचे अंदाज पसरत आहेत. शिवकुमार यांचे समर्थक त्यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करत होते. अनेक आमदारांनीही कॅबिनेट मंत्री होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे काँग्रेसमध्ये तणाव वाढला होता. तथापि, सिद्धरामय्या यांनी या अफवा पूर्णपणे फेटाळून लावल्या आहेत. अधूनमधून काँग्रेसमधील नेतृत्वबदलाचा प्रश्न डोके वर काढत असतो.

कर्नाटकमध्ये काँग्रेसला यश मिळवून देण्यात प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांचा मोठा वाटा असला, तरी समर्थकांची संख्या जास्त असल्याने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री करण्याची वेळ काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींवर आली. त्या वेळी अडीच वर्षांनंतर शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याचा प्रस्ताव होता, असे सांगितले जाते; परंतु सिद्धरामय्या मुख्यमंत्रिपद सोडायला तयार नसल्याने काँग्रेस पक्षश्रेष्ठींपुढे पेच निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या ताब्यात असलेले कर्नाटक हे एकमेव मोठे राज्य आहे. तिथे काँग्रेसला सत्ता आणता येते; परंतु ती टिकवता येत नाही, हा अनुभव आहे. आताही कर्नाटक काँग्रेसमधील संघर्ष सुरूच आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात तणाव आहे. शिवकुमार यांच्या समर्थकांनी उघडपणे नेतृत्वबदलाची मागणी केली नसली, तरी त्यासाठी दिल्ली दरबारी तळ ठोकला आहे. हे समजताच सिद्धरामय्या यांनी अनेक आमदारांसह दिल्ली गाठली. काँग्रेसने नेतृत्वबदल केल्यास आपल्यामागे भरपूर समर्थक असून काहीही होऊ शकते, हे दाखवण्याचा आणि तसा अप्रत्यक्ष इशारा देण्याचा त्यांचा हेतू होता. कर्नाटक हे खर्गे यांचे राज्य असून राष्ट्रीय अध्यक्षांच्या राज्यातला हा सत्तासंघर्ष परवडणारा नाही. एकीकडे शिवकुमार यांनी नेतृत्वबदलाची चर्चा फेटाळून लावली आहे, दुसरीकडे सिद्धरामय्या यांनी पक्षनेतृत्वाचा आदेश शिरसावंद्य राहील, असे सांगितले आहे. मात्र आतून संघर्ष कायम आहे.

कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीला अद्याप वेळ आहे. त्याअगोदर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. एकीकडे ही स्थिती असताना कर्नाटक काँग्रेसमधील सुंदोपसुंदीचा फायदा उठवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. दक्षिण दिग्विजयाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे राज्य भाजपला मागील निवडणुकीमध्ये गमवावे लागले. मागच्यासारखे काँग्रेसच्या आमदारांना गळाला लावून सत्ताबदल करता येतो का, हे भाजप आजमावत आहेच; परंतु माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा हे अल्पवयीन मुलीच्या विनयभंगप्रकरणी चौकशीला सामोरे जात आहेत. त्यांच्या मुलाकडे त्यांच्यासारखे कर्तृत्व नाही. धर्मनिरपेक्ष जनता दल केंद्रातील सत्तेत असले, तरी लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे कुटुंब अगोदरच बदनाम झाले आहे. अशा स्थितीत काँग्रेसमधील सत्तासंघर्षाचा फायदा उठवण्याची भाजपची क्षमता आहे का, हा खरा प्रश्न आहे.

# शेतकऱ्यांचा विचार होणे गरजेचे



**प्रमोद जाधव**

उसर परिसरात नवनवीन प्रकल्प होत आहे. या प्रकल्पांमुळे रोजगाराचे साधन खुले झाले आहेत. या प्रकल्पांसाठी अनेकांनी जमीनी दिल्या आहेत. मात्र त्या जमीनी देणाऱ्या शेतकऱ्यांचा विचार होत नसल्याचे चित्र आजही कायम आहे. काही प्रकल्पांमधून बिनधास्तपणे सांडपाणी सोडले जाते. ते सांडपाणी शेतांमध्ये जात असल्याने भातशेती संकटात आली आहे. या जमीनी नापिक होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विचार होणे गरजेचे आहे.

अलिबाग तालुका हा कृषी प्रधान तालुका म्हणून ओळखला जात असला, तरी येथील निसर्गाचे आकर्षण अनेकांना कायम आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेदेखील हा तालुका महत्वाचा ठरत आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील पर्यटन वाढीला चालना मिळू लागली आहे. पावसाळ्यात वेगवेगळ्या धबधब्यांवर फिरण्याचा आनंद पर्यटक हे घेत असतात. निसर्गाच्या कुशीत असलेल्या गावांमध्ये राहण्याचा आनंदही अनेकजण घेतात. त्यामुळे अनेकजण वेगवेगळ्या ठिकाणी जागा घेऊन फार्महाऊस उभारत आहेत. आरोग्याच्या दृष्टीने देखील हा परिसर कायमच चांगला म्हणून ओळखला जातो. या परिसरातील शेतकरी भात पिकांसह आंबा, हरभरा, तुर आदींच्या पिकांची लागवड करण्याबरोबरच वेगवेगळ्या भाजीपाला लागवडीवरही भर देत आहे. भाजीपाला विक्री करून अनेकजण आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. मात्र गेल्या तीन वर्षापासून या परिसरात वेगवेगळे प्रकल्प येऊ घातले आहेत. या प्रकल्पातून स्थानिकांना रोजगाराचे साधन खुले होत असल्याचे चित्र आहे. मासळी विक्रीपासून भाजीपाला, किराणा सामान आदींची विक्री भरमसाठ होत आहे.

अलिबाग तालुक्यात होत असलेल्या प्रकल्पासाठी येथील शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या आहेत. मात्र प्रकल्प होत असताना स्थानिक व शेतकरी यांचा विचार होणे देखील गरजेचे आहे. काही ठिकाणी भराव मोठ्या प्रमाणात केला जात आहे. काही ठिकाणी बांधकामही होत आहे. या बांधकाम व भरावामुळे पुर्वपरंपरागत पाण्याचे स्रोत बंद झाले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी अनेक शेतांमध्ये जाऊन भातपिकांसह इतर पिक नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे. सिमेंटचे पाणी बाजूला असलेल्या पुर्वपरंपरांगत नदी, नाल्यामध्ये सोडले जात आहे. या पाण्यामुळे नदीतील पाणी दुषित होऊन ते पाणी शेतांमध्ये जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रकल्पाच्या कामासाठी केलेल्या मातीच्या भरावामुळे शेतांमध्ये पाणी साचून भात पिकांची नासाडी होण्याची भिती शेतकऱ्यांनी अनेक वेळा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. याबाबत फक्त बैठका घेतल्या जातात. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत असताना दिसून येत आहे. सिमेंट पाण्यामुळे भात शेती बाधीत होण्याचे संकट उभे राहिले आहे. याकडे महसुल विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. अलिबाग तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी गुरचरण जागेमध्ये घरे बांधली आहेत. मात्र प्रकल्पांच्या नावाखाली या घरांवर अनेकवेळा हातोडा मारण्याचे काम प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक मंडळी बेघर झाली आहेत. मोठ्या कष्टाने उभे केलेले घरं तोडली जात आहेत. प्रकल्प होत असताना स्थानिकांचा विचार त्यांच्या समस्या जाणून घेऊन केल्यास प्रश्न कायमचा मार्गी लागण्यास मदत होईल. रायगड जिल्ह्याला विशेष करून अलिबाग तालुक्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. खर्च अधिक उत्पन्न कमी या कारणांमुळे अनेकांनी शेती करण्याकडे पाठ फिरवली होती. मात्र लॉकडाऊननंतर शेतीकडे असंख्य तरुण वळले आहेत. आंबा लागवडीसह वेगवेगळ्या पिकांची लागवड करण्यावर भर देत आहेत. शेती करण्याकडे तरुण आकर्षित होत असताना वेगवेगळ्या प्रकल्पांच्या नावाने जमीनी प्रशासनाकडून घेतल्या जातात. मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. स्थानिकांचा विचार प्रशासनाने करून शेतकऱ्यांना उज्ज्वल भविष्य देण्याकडे लक्ष द्यावा हीच अपक्षा जनसामान्यांची आहे.

**लोकसंसद**

## असे करा सुट्यांचे नियोजन !

नोव्हेंबर ते जानेवारी हे महिने विशेष पर्यटनाचे महिने असतात. सहलीची ठिकाणे या दिवसांत गजबजलेली असतात. नोकरी-व्यवसाय करणारी मंडळी खास सुट्या घेऊन मुलाबाळांसह या कालावधीत फिरायला जातात. यानिमित्ताने पर्यटन तर होतेच शिवाय नेहमीच्या धकाधकीच्या जीवनाला बाजूला करून वेगळे जीवन जगताना कुटुंबासाठीही वेळ देता येतो. कुटुंबासाठी घेतलेल्या सुट्टीचा उपयोग अनेकदा पालक केवळ मौजमजेसाठी करताना दिसतात त्यासाठी रिसॉर्ट, वॉटर पार्क किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा बेत आखला जातो. ज्यांच्या घरात शाळकरी मुले आहेत अशांनी सुट्यांचे नियोजन करताना पर्यटनासोबत मुलांच्या ज्ञानात कसा भर पडेल आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांना शिक्षणातही कसा होईल याचाही विचार करायला हवा. आपल्या अद्वितीय पराक्रमाने, इच्छाशक्तीने आणि चातुर्याने इतिहास घडवणारे भारतातील महापराक्रमी राजे-महाराजे इतिहासाच्या पुस्तकातून मुलांना ज्ञात होतात. त्यांच्या पराक्रमांची साक्ष देणारे गड, दुर्ग, किल्ले यांची माहिती मिळते; मात्र ते जवळून अनुभवण्यासाठी, त्यांच्या पराक्रमाच्या आणि बलिदानाच्या खुणा डोळ्यांनी पाहण्यासाठी, त्यांचे अद्वितीय शौर्य प्रत्यक्ष न्याहाळण्यासाठी मुलांना अशा ठिकाणी घेऊन जाण्यासाठी हीच नामी संधी असते. त्यादृष्टीने गड-किल्ले दर्शनाचा समावेश सुट्यांच्या नियोजनात करायला हवा. महाराष्ट्र ही साधू संतांची भूमी आहे.व्यवहार करताना परमार्थ कसा करावा याची शिकवण देऊन जीवनाचा उद्धार करण्याचा मूलमंत्र देणारी कितीतरी संत महंत मंडळी, अवतारी पूरूष महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांच्या वास्तव्याने आणि सहवासाने पुलकित झालेली अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत. एरव्हीच्या धकाधकीच्या जीवनातून काहीकाळ बाजूला काढताना या चैतन्यमय ठिकाणी मुलांना घेऊन जाऊन त्यांच्यासह स्वतःही तेथील सात्त्विकतेचा लाभ घ्यायला हवा. महाराष्ट्रभूमी जशी साधुसंतांची भूमी आहे तशी अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अध्यात्मिक भूमी म्हणूनही महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे. अष्टविनायक, विविध शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग या भूमीत वसली आहेत. या प्रत्येक क्षेत्राचा एक वेगळा इतिहास आहे. दूरचित्रवाहिनींवरील मालिका, ग्रंथ आणि इंटरनेट आदींच्या माध्यमातून आपण तो जाणून घेतलेला असतो. हा इतिहास जवळून जाणून घेण्यासाठी आणि तेथील चैतन्य आणि शक्ती अनुभवण्यासाठी अशा ठिकाणी कुटुंबासह जायला हवे. याशिवाय स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, विचारवंत, समाज सुधारक यांच्या स्मारकांना भेट देऊन त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी घेतलेल्या सुट्टीचा उपयोग करता येईल. यंदाच्या सुट्ट्यांचे नियोजन करताना पालकांनी या गोष्टीही ध्यानात घेऊया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

**दिनविशेष**

# आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन दरवर्षी ९ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. भ्रष्टाचाराच्या दूरगामी परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन साजरा केला जातो. भ्रष्टाचाराविरुद्ध जनतेने अधिकाधिक जागरूक झाले पाहिजे. तरच सुसंस्कृत समाज आणि सशक्त लोकशाही देश निर्माण होऊ शकतो, या उद्देशाने आजचा दिवस साजरा केला जातो. गेल्या काही वर्षांमध्ये, आंतरराष्ट्रीय बळकटीकरणासाठी आणि या विषयाबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि भ्रष्टाचारविरोधी धोरणे सामायिक करण्यासाठी दिवसाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भ्रष्टाचारामुळे संस्थांवरील विश्वास कमी होतो. अर्थव्यवस्था कमकुवत करते. सामाजिक विषमता वाढवते. त्यामुळे शिक्षण, आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांच्या प्रगतीत अडथळा येतो. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भ्रष्टाचाराचा सर्वाधिक फटका देशातील सामान्य नागरिकाला बसतो. आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन सामूहिक कृतीच्या महत्त्वावर भर देतो. भ्रष्टाचाराचा मुकाबला करणे म्हणजे कायदे आणि धोरणे बनवणे नव्हे तर दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनाच्या संस्कृतीला चालना देणे हे स्मरण करून देणारा दिवस आहे. जागरुकता वाढवणे आणि बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने अनेक लोक मोहिमा, चर्चा आणि पुढाकार घेऊन हा दिवस साजरा करतात. आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन जगभरातील लाखो लोकांना लाचखोरी, फसवणूक आणि सत्तेच्या दुरुपयोगाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देतो. आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिनानिमित्त सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील भ्रष्टाचार निर्मूलनासाठी एकत्रितपणे काम करण्यासाठी योजना आखल्या जात आहेत. यात तरूणांना सामील करून जगभरात एकात्मतेचे आवाहन करणे, हे या दिवसाचे उद्दिष्ट आहे. भ्रष्टाचाराविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि या समस्येशीलढण्यासाठी योग्य मार्ग मिळावा म्हणून ९ डिसेंबर रोजी जागतिक भ्रष्टाचार विरोधी दिन साजरा केला जातो. समाजाच्या प्रत्येक घटकातील व्यक्ती, गैर सरकारी संस्था, कायद्याची अंमलबजावणी करणारे आणि प्रसारमाध्यमे यांची भूमिका अधोरेखित करण्याचा हा दिवस आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या म्हणण्यानुसार भ्रष्टाचार ही जागतिक समस्या बनली आहे. यात सर्वच देश भरडले गेले आहेत. एका अहवालानुसार भ्रष्टाचाराची जागतिक किंमत जगातील देशांतर्गत उत्पादनाच्या पाच टक्के किंवा २.६ ट्रिलियन आहे. भ्रष्टाचार रोखणे समाजासाठी आवश्यक आहे कारण लोकांना आरोग्यसेवा आणि इतर आत्यावश्यक सेवांमध्ये लोकशाहीचा भक्कम आधार आणि मदत मिळते. आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन हा शाश्वत विकास साधायचा असेल तर त्यासाठी भ्रष्टाचार अडथळा आणतो, यावर वस्तुस्थितीवर प्रकाश टाकतो. भ्रष्टाचाराशिवाय भविष्य घडवण्यात तरुणांचे महत्त्व ओळखते. हा दिवस तरुणांना भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी आणि सरकार आणि नागरिकांमधील जबाबदारी आणि पारदर्शकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी प्रेरित करतो आणि प्रोत्साहित करतो. भ्रष्टाचार आणि त्याच्या गैरवर्तनाच्या सामायिक समस्यांशी लढण्यासाठी देशांना जोडते. भ्रष्टाचार म्हणजे वैयक्तिक फायद्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाराचा गैरवापर करणे. भ्रष्टाचार विश्वासाला कमकुवत करतो, लोकशाहीला कमी करतो, आर्थिक विकासाला अडथळा आणतो आणि असमानता, गरिबी, सामाजिक विखंडन आणि पर्यावरणीय संकट वाढवतो. भ्रष्टाचार कसा चालतो आणि त्याला चालना देणाऱ्या संरचना कशा आहेत हे आपण समजून घेतले तरच भ्रष्टाचार उघड करणे आणि भ्रष्टाचार्यांना जबाबदार धरण्याची खात्री करणे शक्य आहे. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी म्हटल्याप्रमाणे, भ्रष्टाचार हा "सार्वजनिक विश्वासाचा अंतिम विश्वासघात" आहे आणि तो विकास, सुरक्षा आणि सर्व व्यक्तींचे हक्क नष्ट करतो." यामुळे व्यवस्था आणि संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी होतो. भ्रष्टाचार शांतता, सुरक्षा आणि आर्थिक विकासात अडथळा आणतो, ज्यामुळे व्यवसाय, क्रीडा, न्यायाची उपलब्धता आणि शिक्षण यासारख्या क्षेत्रांवर परिणाम होतो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**९ डिसेंबर**

१) श्री.पांडुरंग तुकाराम दळी
अलिबाग, ९-१२-१९३६

## यावर्षी भात खरेदी घटणार?

### • ओला दुष्काळ, ई-पीक नोंदीमुळे वाढल्या अडचणी

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

तालुका सहकारी खरेदी विक्री संघातर्फे २०२५-२६ या हंगामातील भात खरेदीला सुरुवात झाली असून प्रति क्विंटल २३६९ रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. मात्र यावर्षी ओल्या दुष्काळामुळे झालेले नुकसान, ई-पीक नोंदणीतील अडचणी यासह अन्य भात खरेदी संदर्भात शासनाने जाचक अटी घातल्यामुळे शेतकऱ्यांकडून नोंदणीकरिता कमी प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

भात शेतीची ई-पीक नोंद करतेवेळी एरर मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यामध्ये मोबाईल नेटवर्कची समस्याही मोठी आहे. त्यामुळे ई-पीक पोर्टलला नोंद झालेली नाही. शेतकऱ्यांना शासकीय आधारभूत किंमत योजनेची नोंदणी करताना अडचण येऊ लागली आहे. शेतकरी ओल्या दुष्काळामुळे प्रचंड अडचणीत



आलेले असतानाच त्यामध्ये यावर्षी शासनाने ऑफलाईन ई-पीक नोंदणीला मान्यता देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी या विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांचा भात खरेदी योजनेसाठी अपेक्षेप्रमाणे कमी प्रतिसाद मिळत आहे. शासकीय आधारभूत किंमत योजना २०२५-२६ करिता केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आधार प्रमाणिकरण पद्धत वापरून व आवश्यक असणारी कागदपत्रे, शेतकऱ्यांचा चालू खरीप हंगामातील भात खरेदी ई-पिकाची नोंद असलेला मूळ सातबारा, ८-अ, आधारकार्ड, बँक पासबुक, पॅनकार्ड घेऊनच त्याची बीइएएम पोर्टलवर शेतकरी नोंदणी करण्यात येईल.

शेतकऱ्यांनी स्वयंघोषणापत्र, अॅग्रीस्टॅक नोंदणी प्रमाणपत्र, देवस्थान जमीन किंवा वन हक्क जमिनीवरील शेतकऱ्यांचे तहसीलदार कार्यालयात केलेले प्रतिज्ञापत्र असेल तरच नोंदणी केली जाईल. दुसऱ्याच्या शेत जमिनीमध्ये भात पीक घेतले असेल तर भाडे करार प्रतिज्ञापत्र तहसीलदार यांच्याकडून प्रमाणित करून घेणे असणे आवश्यक आहे. त्यामुळे या कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन खरेदी विक्री संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दोन डम्परची धडक; एकाचा जागीच मृत्यू

**चिपळूण:** मुंबई-गोवा महामार्गावर चिपळूणजवळील सावर्डे कोंडमळा वळणावर दोन डम्पर वाहनांमध्ये भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एका चालकाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा चालक गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. अपघातानंतर डम्पर महामार्गाच्या मध्यभागी आडवे गेल्याने रस्ता पूर्णपणे बंद झाला. त्यामुळे दोन्ही दिशांनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि त्यामुळे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. सकाळच्या वेळेत हा अपघात झाल्याने कामावर जाणारे, प्रवासी तसेच मालवाहतूक वाहनचालक या सर्वांची मोठी गैरसोय झाली होती.

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**नेरळ :** विद्या मंदिर मंडळ संचालित नेरळ, ममदापूर येथील मातोश्री टिपणीस महाविद्यालय यांच्याकडून दरवर्षी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. यावर्षी दि.११ डिसेंबर रोजी ही स्पर्धा होत असून या स्पर्धेचे हे नववे वर्षे आहे. या स्पर्धेसाठी समाजातील दैनंदिन घडामोडी यांच्याबाबतचे विषय ठेवण्यात आले आहेत. यात शेतकरी कर्जमुक्त कधी होणार?, सध्याच्या राजकारण लोकशाहीचा उत्सव की ढोंग, समाजमाध्यम अभिव्यक्ती स्वातंत्र्य व्यासपीठ आणि अफवांचा बाजार, भारतीय कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक बांधिलकी आणि आरक्षण जातीनिहाय की आर्थिक निकषांवर, असे विषय देण्यात आले आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

**| ठाणे | प्रतिनिधी |**

ऑनलाइन मैत्रीतून एका तरुणीची लाखोची फसवणूक झाली आहे. मीरा रोडमध्ये राहणाऱ्या एका तरुणीला एकाने लग्नाचे आमिष दाखवून तब्बल ६५ लाखांचा गंडा घातला आहे. चेतन शर्मा (२५) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी काशीगाव पोलिसांनी चेतन व त्याच्या आईवडिलांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पंजाबमधील पठाणकोट अब्रोलनगर परिसरात राहणाऱ्या चेतन शर्मा याने ऑक्टोबर २०२३ मध्ये मीरा रोडमध्ये राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीसोबत इन्स्टाग्रामवर मैत्री केली. हळूहळू मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. तरुणीचा विश्वास संपादित केल्यानंतर या भामट्याने तिला लग्नासाठी मागणी घालून साखरपुडा केला. त्यानंतर तिच्यासोबत अनैतिक संबंध ठेवले. या काळात त्याने तरुणीकडून नोकरीचे कारण व विविध कारणे सांगून ६५ लाख ३० हजारांची फसवणूक केली.

अनेक महिने उलटले तरी चेतन लग्न करत नसल्याने तरुणीला संशय आला. तिने चेतनच्या आईवडिलांसोबत संपर्क केला असता त्यांनीही तिला शिवीगाळ केली. दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिने काशीगाव पोलीस ठाण्यात धाव घेत चेतन व त्याच्या आईवडिलांविरोधात तक्रार दाखल केली आहे.

## गणपतीपुळेत भाविकांची तुफान गर्दी

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

गणपतीपुळे येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त गणेशभक्तांनी श्रींच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रविवारी (दि.७) शासकीय सुट्टी असल्यामुळे दिवसभरात सुमारे ३५ हजार भक्तांनी दर्शन घेतल्याची नोंद गणपतीपुळे मंदिरात झाली आहे. त्यामुळे पर्यटन व्यावसायिकांना दिलासा मिळाला.

दिवाळीपासून पर्यटन हंगामाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली होती. परंतु नगरपालिका निवडणुकांमुळे शासकीय कर्मचारी, मध्यमवर्गीही लोकं काही प्रमाणात त्यामध्येच व्यग्र झालेले होते. परंतु शनिवार, रविवार जोडून सुट्ट्या आल्याने आणि त्यातही रविवारी संकष्टी चतुर्थी



### व्यावसायिकांनाही मिळाला दिलासा

असल्याने पर्यटक शनिवारपासूनच गणपतीपुळेमध्ये दाखल झालेले होते. श्रीचे दर्शन आणि किनाऱ्यावर फिरणे अशा दोन्ही गोष्टींचा आनंद घेत येत असल्याने पर्यटक असा योग साधत असतात.

रविवारी सकाळी पहाटे पूजा झाल्यानंतर मंदिरात दर्शनाला सुरूवात झाली होती. दर्शन घेतल्यानंतर पर्यटक किनाऱ्यावर फिरण्यासाठी दाखल होत होते. त्यामुळे फेरीवाले, जलक्रीडा चालक यांचादेखील फायदा झाला.

## कल्याणच्या पोलीस ठाण्यांना फॉरेन्सिक व्हॅन

### तपासात वेग, वैज्ञानिक काटेकोरपणा वाढणार

**| ठाणे | प्रतिनिधी |**

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कल्याण पोलीस आता सज्ज झाली आहे. गुन्ह्यांचा झटपट छडा लावण्यासाठी पोलिसांची फॉरेन्सिक व्हॅन आता ऑन रोड उतरली आहे. त्यामुळे तपास फास्ट होणार असून तपासात वेग, अचूकता व वैज्ञानिक काटेकोरपणा वाढणार आहे. ही अत्याधुनिक सेवा २४ तास उपलब्ध राहणार असल्याने कल्याण परिमंडळ तीनमधील आठही पोलीस ठाण्यांना नवे बळ मिळणार आहे.



कल्याण परिमंडळ तीन अंतर्गत महात्मा फुले चौक, बाजारपेठ, कोळसेवाडी, खडकपाडा, रामनगर, विष्णूनगर, मानपाडा व टिळकनगर अशा आठ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. मात्र गुन्ह्यांचा पर्दाफाश करण्यासाठी तेथील पोलिसांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. फॉरेन्सिक चाचण्या व त्याचा अहवाल प्राप्त होण्यासाठी पोलीस दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागतात. यावर तोडगा म्हणून परिमंडळ तीनतर्फे या अत्याधुनिक व्हॅनची सुविधा सुरू करण्यात आली आहे. या व्हॅनमध्ये सहाय्यक रासायनिक विश्लेषक, वैज्ञानिक सहाय्यक आणि प्रशिक्षित प्रयोगशाळा तज्ज्ञांची टीम कार्यरत असणार आहे.

## मोबाईलची चोरी

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रेल्वेस्टेशन येथे एका हॉटेलच्या बाजूला वडापावच्या गाडीवरुन अज्ञात चोरट्याने मोबाईल पळविला. ही घटना शनिवारी (दि.६) गणेश वडापाव सेंटर येथे घडली. फिर्यादी उमेश प्रकाश सुर्वे (५०) यांनी आपला मोबाइल वडापावच्या गाडीवर ठेवला असताना चोरट्याने तो पळविला. या प्रकरणी उमेश सुर्वे यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरुन पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## सफाई कर्मचारी दाम्पत्याचा प्रामाणिकपणा

**| पालघर | प्रतिनिधी |**

सफाई काम करणाऱ्या दाम्पत्याला दहा लाख रुपयांचा हिऱ्याचा हार कचऱ्याच्या डब्यात सापडला. त्यांनी तो हार संबंधित व्यक्तीला परत केला. त्यामुळे सफाई काम करणाऱ्या या दाम्पत्याचा प्रामाणिकपणा समाजासाठी एक प्रेरणादायी ठरत आहे. मिरारोड पूर्वेच्या गौरव गॅलेक्सी फेस-१ या परिसरात गीतादेवी रंगू यांचे कुटुंब राहत आहे. शुक्रवारी (दि.५) हीऱ्यांचा हार गहाळ झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संपूर्ण घराची झाडाझडती घेतल्यानंतर हार सापडला नाही. हार कचऱ्याच्या डब्यात गेल्याचा संशय त्यांना होता. या संपूर्ण सोसायटीची साफसफाई करणारे रमेश रामदरी बैध आणि त्यांची पत्नी पल्लवी बैध यांनी त्यांना सांगितले. परिसरातील सर्व कचऱ्याच्या डब्यात शोध घेण्यात आला. तीन तासांच्या अथक परिश्रमानंतर कचऱ्याच्या डब्यात हिऱ्याचा हार सापडला. या सफाई कर्मचाऱ्यांनी डायमंडचा हार प्रामाणिकपणे संबंधित मालकाला परत केला.

## कर्जबाजारी झाल्याने स्वतःला पेटवले

**| पालघर | प्रतिनिधी |**

इमारतीच्या सदनिकेत भीषण आग लागल्याची घटना विरार येथील मामानगर परिसरात घडली आहे. या आगीत दोन जण जखमी झाले असून एकाचा मृत्यू झाला आहे. अखिलेश विश्वकर्मा असे मृत व्यक्तीचे नाव असून त्यांनी कर्जबाजारी झाल्याने स्वतःला पेटवून घेतल्याची माहिती समोर येत आहे.

विरारपूर्वेच्या मामानगर परिसरात अरुण दीप प्लाझा या इमारतीच्या तळ मजल्यावरील एका सदनिकेला अचानक आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र या आगीत तीन जण होरपळले. यातील एकाचा मृत्यू झाला. तर जखमींना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही आग अखिलेश याने स्वतःच लावली असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आले आहे. कर्जबाजारी झाल्याने त्यानेच स्वतःला पेटवून घेतले.

## उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात कचरा

### रुग्णांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**| ठाणे | प्रतिनिधी |**

डहाणू शहरातील आगर येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात टाकाऊ कचरा साचला आहे. यातून आरोग्य व्यवस्थेतील निष्काळजीपणा पुन्हा एकदा उघड झाला आहे. तर खुलेआम विखुरलेल्या कचऱ्यामुळे रुग्ण, नातेवाईक व स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला आहे.

रुग्णालयाच्या आवारात प्लास्टिक, अन्नाचा कचरा, वेस्ट मटेरियल आणि विविध टाकाऊ साहित्य मोठ्या प्रमाणात पडून असल्याचे चित्र समोर आले आहे.



या कचऱ्यामुळे केवळ अस्वच्छता नाही तर डास, माश्या आणि भटक्या प्राण्यांची वाढ होऊन संसर्गजन्य आजारांचा धोका तीव्र होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. रुग्णालय परिसरात स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिक व रुग्णांमध्ये रोष वाढत आहे. आरोग्य सेवांच्या व्यवस्थेबाबत यापूर्वीही अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. सुविधांचा अभाव, स्वच्छतागृहांची दुरवस्था, स्टाफची कमतरता हे प्रश्न अद्याप सुटलेले नसताना आता परिसरातील कचऱ्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. ज्याठिकाणी उपचार मिळायला हवेत, त्याच ठिकाणी आजार पसरण्याची शक्यता वाढत असेल तर रुग्णांचा रुग्णालयावरील विश्वास कसा टिकणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालय परिसराची तातडीने स्वच्छता करून परिसरात कचरा कुंडी बसवणे आणि सतत स्वच्छता मोहीम राबवण्याची नागरिकांची मागणी आहे.

> रुग्णालयात टाकाऊ कचरा व्यवस्थापनाची योग्य सोय करण्यात आली आहे. परिसरात खुलेआम कचरा टाकणे चुकीचे असून ते पूर्णतः टाळले पाहिजे. या प्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने योग्य ती व्यवस्था करण्यात येईल.
>
> – डॉ. ऋग्वेद दुधाट, तालुका वैद्यकीय अधिकारी

### २० हजार प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था | सिडकोने केली निविदा प्रक्रिया सुरू

## नवी मुंबईत उभारणार सर्वात मोठा 'अरेना'

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

न्यूयॉर्क आणि लंडनच्या देशातील सर्वात मोठा अरेना नवी मुंबईत उभा करण्यासाठी सिडकोने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. या आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेनात २० हजार प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था असणार असून २५ हजार प्रवासी उभो राहू शकणार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, गोल्फ कोर्स, इंटरनॅशनल कॉर्पोरेट पार्कपाठोपाठ सिडकोने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतल्याने सुनियोजित शहराची आंतरराष्ट्रीय पातळीवर आणखी एक ओळख निर्माण होणार आहे.

देशभरात सध्या छोटे मोठे ३५ अरेना आहेत. त्यांची क्षमता २ हजार ते १५ हजार प्रेक्षकांची



आहे. कोलकाता येथील नेताजी इनडोअर स्टेडियममध्ये १५ हजार प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आहे. दिल्ली आणि पाँडिचेरीमधील इंदिरा गांधी अरेनामध्ये प्रत्येकी १४ हजार ३४८ प्रेक्षक बसू शकतात. सिडकोने मात्र नवी मुंबईत सुमारे ४५ हजार प्रेक्षकांची क्षमता असलेला अरेना उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. हा अरेना न्यूयॉर्कमधील मॅडिसन स्क्वेअर गार्डन इनडोअर अरेना आणि लंडन येथील ओ टू अरेना यांच्या धर्तीवर साकारण्यात येणार आहे. अरेनाच्या निर्मितीसाठी सिडकोने संबंधित संस्थांकडून अर्ज मागवले आहेत. त्यानुसार संस्थांना ९ ते ३१ डिसेंबरदरम्यान आपल्या निविदा सादर करता येणार आहेत.

### आर्थिक क्रांतीचा पाया

२० हजार आसन क्षमता आणि २५ हजार उभे राहण्याची क्षमता असलेले हे देशातील पहिले जागतिक दर्जाचे आणि भव्य इनडोअर अरेना असेल. जे जागतिक दर्जाचे मनोरंजन कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, भव्य सांस्कृतिक महोत्सव आणि तल्लीन करणारे सादरीकरण आयोजित करेल. नवी मुंबईला जागतिक दर्जाचे करमणूक केंद्र व उत्कृष्ट शहर म्हणून प्रस्थापित करण्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे. देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना उभारण्यासाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया ही आगामी सांस्कृतिक आणि आर्थिक क्रांतीचा पाया आहे.

> **हा प्रकल्प भारतीयांसाठी जागतिक दर्जाचे मनोरंजन खुले करेल, कलाकार, मनोरंजन आणि स्थानिक समुदायासाठी असंख्य संधी निर्माण करेल आणि जागतिक नकाशावर नवी मुंबईचे स्थान आणखी मजबूत करेल, प्रत्येक टप्प्यावर कल्पना प्रत्यक्षात आणण्याची सिडकोची वचनबद्धता दर्शवेल.**
>
> **– विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## निवडक

### कोलाड येथे रक्तदान शिबीर

**कोलाड :** अनिरुद्धाज अॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या माध्यमातून सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कोलाड यांच्या वतीने रविवारी (दि.७) प्राथमिक आरोग्य केंद्र, आंबेवाडी येथे रक्तदान शिबीर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी सर्व रक्तदात्यांना कोलाड केंद्राच्या वतीने कृपासिंधू दिनदर्शिका २०२६ भेट म्हणून देण्यात आली. या शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. शासकीय रक्तपेढी अलिबागच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित पद्धतीने ३६ रक्तदान पिशव्या रक्तसंकलन करण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि आरोग्य तपासणी अहवाल देण्यात आला. सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कोलाड यांनी शिबिराचे उत्तम नियोजन करून सर्व व्यवस्थापन सुरळीत पार पाडले. या उपक्रमामुळे तातडीच्या वेळी रक्ताची उपलब्धता वाढून रुग्णांना दिलासा मिळणार असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. शिबीर यशस्वी करण्यासाठी अनिरुद्ध उपासना केंद्र कोलाड सर्व श्रद्धावानांनी मेहनत घेतली.






### राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर

**तळा :** जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत हिवाळी सात दिवसीय निवासी शिबीर आयोजित केले आहे. हे शिबीर दि.८ डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत असून त्याचा उद्घाटन सोहळा चरई बुद्रुक येथे उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तळा तालुक्याचे पोलीस अधिकारी सतिश गवई तसेच तळा तालुका गट विकास अधिकारी महादेव शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे हे होते. गाव समितीचे अध्यक्ष नारायण पतारे व उपाध्यक्ष काप यांनीही यावेळी उपस्थिती दर्शवली. शिबिराचा विषय 'विकसित भारतासाठी युवकांचे योगदान' असा ठरविण्यात आला आहे. या माध्यमातून स्वच्छ भारत, सुंदर भारत, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संरक्षण आदी विषयांवर विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. उद्घाटन प्रसंगी सर्व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी चरई बुद्रुक ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला असून त्यांनी शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग नोंदविला.

### नवी मुंबईसाठी आणखी एक मेट्रो

**नवी मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला नवी मुंबई विमानतळाशी जोडण्यासाठी राज्य सरकारने सिडकोसोबत मिळून मेट्रो लाईन ८ उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या मार्गिकेमुळे नवी मुंबईतील उपनगरांना पहिल्यांदाच थेट मेट्रो जोडणी मिळणार असून, शहराला स्वतःची 'अंतर्गत मेट्रो'देखील उपलब्ध होणार आहे. या लाईनवर नवी मुंबईतील तब्बल ११ स्थानके प्रस्तावित आहेत. राज्य सरकारकडून मंजुरीनंतर मेट्रो लाईन ८ चा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला असून, त्यात प्रस्तावित मार्ग आणि स्थानकांची माहिती दिली आहे. मानखुर्दहून वाशी खाडी पूल ओलांडल्यानंतर ही मेट्रो सायन-पनवेल महामार्गाला जोडेल. त्यानंतर नेरूळ, सीवूड्स, उलवे अशा भागांतून मार्ग जात थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचेल. एमएमआरडीएच्या ३३७ किमी मेट्रो नेटवर्कमध्ये आता मेट्रो ८चा समावेश करण्यात आला आहे.



### चिपळूण उड्डाणपुलाच्या कामाला वेग



**चिपळूण :** मुंबई-गोवा महामार्गावरील चिपळूण शहरातील सर्वात लांब उड्डाणपुलाचे काम वेगात सुरू आहे. येत्या मार्च अखेरपर्यंत या पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यादृष्टीने संबंधित ठेकेदार कंपनीने पावले उचलली आहेत. बहादूरशेख चौक ते अतिथी हॉटेलपर्यंत उड्डाणपूल होणार आहे. सुरुवातीला अत्याधुनिक पद्धतीच्या तंत्रज्ञानाने हा पूल उभारला जाणार होता. मात्र, उभारणी दरम्यानच बहादूरशेख चौक या ठिकाणी हा पूल कोसळला. यानंतर पारंपरिक पद्धतीने या उड्डाणपुलाचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार आधीच्या पिलरमध्ये आणखी एक पिलर टाकून पुलाचे काम सुरू झाले. आता बहुतांश ठिकाणची पिलरची कामे पूर्ण झाली असून त्यावर गर्डर चढवण्याचे कामही ७५ टक्के पूर्ण झाले आहे. ज्या भागात गर्डर टाकले आहेत त्या ठिकाणी आता स्लॅबची तयारी करण्यात येत आहे, तर रावतळे भागातील स्लॅबदेखील पूर्ण झाला आहे. एका बाजूला गर्डर आणि स्लॅबचे काम सुरू असतानाच दुसऱ्या बाजूला उड्डाणपुलाच्या अॅप्रोज रोडचे कामदेखील गतीने सुरू करण्यात आले आहे. दोन्ही बाजूंना अॅप्रोच रोडची भिंत आणि मध्ये भरावाचे काम वेगात सुरू झाले आहे. येत्या मार्च २०२६ अखेर उड्डाणपुलाचे काम पूर्ण करून वाहतूक सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

### पोलिसाकडून महिलेवर अत्याचार

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील कासा पोलीस ठाण्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका पोलीस हवालदाराने तक्रारी अर्जाच्या चौकशीसाठी आलेल्या महिलेवर लैंगिक अत्याचार केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून पोलीस हवालदारावर गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला आपल्या एका तक्रारी अर्जाच्या चौकशी संदर्भात कासा पोलीस ठाण्यात आली होती. याच पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या शरद भोगाडे नावाच्या पोलीस हवालदाराने चौकशीच्या बहाण्याने महिलेला पोलीस ठाण्यामागे असलेल्या पोलीस लाईनच्या खोलीत नेले. त्याच ठिकाणी त्याने महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप महिलेने केला आहे. या संतापजनक प्रकारानंतर पीडित महिलेने धाडस दाखवत हा संपूर्ण प्रकार उघडकीस आणला आणि पोलिसांत तक्रार दाखल केली.

# बीडीओंसह अनेकजण सामूहिक रजेवर

## ॥ ग्रामविकास विभागाची परवानगी न घेता कारवाई



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीमधील महिला अधिकाऱ्यावर अपहाराचा ठपका ठेवत त्यांना अटक करण्यात आली. रात्री उशिरा कोणतीही प्राथमिक प्रशासकीय चौकशी न करता आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता त्यांना अटक करण्यात आली. याविरोधात रायगड जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांसह अनेकांनी निषेध व्यक्त केला. अलिबागमधील जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर निदर्शने करीत सोमवारपासून सामूहिक रजा आंदोलन करण्यात आले.

ग्रामीण विकास प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी गजानन लेंडी, शुभांगी नाखले आदींसह गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी उपस्थित होते.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीतील मनरेगा योजनेत झालेल्या कथित अपहार प्रकरणात केवळ एका कंत्राटी कर्मचाऱ्याच्या साक्षीवर आणि काही व्यवहारांवर गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्या डिजिटल सिग्नेचरचा वापर झाल्याचा उल्लेख हा एकमेव आधार मानून (दि.२) डिसेंबर रोजी रात्री उशिरा कोणतीही प्राथमिक प्रशासकीय चौकशी न करता आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता त्यांना अटक करण्यात आली. महिला अधिकारी असल्याने आवश्यक असलेल्या कायदेशीर व प्रक्रियात्मक सावधगिरीची ही उपेक्षा झाल्याचे बोलले जात आहे. ही संपूर्ण कारवाई डिजिटल सिग्नेचरचा वापर म्हणजेच गुन्ह्यात सहभाग या एकतर्फी आणि तांत्रिकदृष्ट्या त्रुटी पूर्ण धारणे-वर आधारित असल्याने ती अत्यंत चिंताजनक आहे. मनरेगाच्या डिजिटल प्रक्रियेत कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून डेटा एन्ट्री, एमआयएस व एसएनए व्यवहार, एनपीसीआय मॅपिंग, आधार पडताळणी इत्यादी सर्व बाबी हाताळल्या जातात. डिजिटल सिग्नेचर ही फक्त अंतिम टप्प्यात वापरली जाते. अशा परिस्थितीत कंत्राटी कर्मचारी किंवा तांत्रिक प्रक्रियेतील त्रुटींसाठी गटविकास अधिकारी यांनाच थेट गुन्हेगार ठरविणे हे प्रशासकीय न्यायाच्या विरोधात आहे.

गटविकास अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात अनेक बाबी असतात. या सर्व बाबी थेटपणे तपासणे गटविकास अधिकाऱ्यांना कदापि शक्य नाही, असे असतानाही मनरेगा आणि घरकुलमध्ये गटविकास अधिकाऱ्यांच्या डिजिटल सिग्नेचरचा वापर झाला म्हणून कोणत्याही चौकशीविना त्यांना थेट अटक करण्यात आली. ग्रामविकास विभागाची कोणतीही परवानगी पोलीस विभागाने घेतली नाही. पोलिसांच्या या भूमिकेविरोधात रायगड जिल्ह्यातदेखील तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. रायगडचे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे मनरेगा, घरकुल अथवा इतर कोणत्याही विषयात अपहार, गैरव्यवहार किंवा अनियमितता झाल्याचा प्रथमदर्शनी संशय असल्यास विभागीय चौकशी करून संबंधित अधिकारी दोषी आढळत नाही, तोपर्यंत गुन्हा दाखल करण्यात येऊ नये. कोणत्याही अनियमितता आणि गैरव्यवहाराच्या प्रकरणात अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यापूर्वी शासनाची पूर्वमंजुरी बंधनकारक करावी.सुनिता मरसकोल्हे आणि आर्वी पंचायत समितीतील तत्कालीन सर्व गटविकास अधिकारी यांना तातडीने कायदेशीर व प्रशासकीय संरक्षण द्यावे. मनरेगाच्या तांत्रिक प्रणालीतील त्रुटींवर आधारित अधिकाऱ्यांना दोषी धरण्याची पद्धत त्वरित थांबवावी. डिजिटल सिग्नेचर वापराबाबत जबाबदाऱ्या, अधिकार, प्रक्रियेतील मर्यादा आणि संरक्षण स्पष्ट करणारी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे राज्यभर लागू करावीत. आर्वी प्रकरणातील चुकीच्या अटक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर आणि डिजिटल सिग्नेचर वापराशी संबंधित वाढत्या धोक्याचा विचार करून महाराष्ट्र विकास सेवेतील सर्व अधिकारी सोमवारपासून रजेवर गेले आहेत. मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास सदरचे आंदोलन यापुढे सुरु राहील, असा इशारा महाराष्ट्र विकास सेवा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.


# निवडक

## हरवलेली महिलेच्या नातेवाईकांचा शोध



**पनवेल :** खांदेश्वर पोलिसांना एक हरवलेली महिला मिळून आली असून तिच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत. सदरची महिलाही खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत मिळाली असून तिचा पत्ता तिच्या लक्षात नाही व तीचे नाव आरती जाधव ( वय ३६ ) माहीम येथून आलेली आहे, एवढेच सांगत आहे. जर कोणी यांच्या परिचयाचे असतील तर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे फोन नंबर ९८५०६४१६२९ येथे संपर्क साधण्योच आवाहन करण्यात आले आहे.

## केतकीच्या मळ्यात गुरुचरित्राचे पारायण



**अलिबाग:** अलीबाग तालुक्यातील 'केतकीचा मळा' या गावात महर्षी न्यायरत्न धुंडीराज गोविंद विनोद यांचा १९०२ साली जन्म झाला. ते स्थान सिद्धाश्रम नावाने प्रसिद्ध आहे. आश्रमात उंबराचे झाडे आहे. या झाडाच्या बुंदराजवळ दत्ताची मूर्ती व शंकराची पिंडी व दत्ताच्या पादुका आहेत. हे स्थान अतिशय पवित्र आहे. १९६२ सालापासून पाराभोवती बसून गुरुचरित्राचे पारायण करण्याची परंपरा आहे. गुरुचरित्राचे पारायण करुन दत्ताचा जन्म या ठिकाणी केला जातो. दत्तजन्माचे कीर्तन करण्याची प्रथा आहे. ॲड. अदिती वैद्यांनी १९९२ मध्ये चारुदत्त आफळे यांचेकडून कीर्तन करण्याचे खास शिक्षण घेतले. त्या स्वत: सदर कीर्तन करत होत्या. यावर्षी मात्र, अलिबागच्या जीवन जोशी या कीर्तनकारांना बोलावण्यात आले होते. त्यांनी कीर्तनाची परंपरा पुढील पिढीकडे सुपूर्त केली आहे. या कार्यक्रमांचे प्रास्ताविक विवेक नवाळकरांनी केले. पुरुषोत्तम, प्रांजली पाटील यांनी त्यांना संगीताची साथ दिली. दिवाकर रावते, दिनेश तळपदे, किरण धामणे, अण्णा राजे आणि ॲड. अदिती वैद्य यांनी गुरुचरित्र पारायण केले. या परंपरेची जबाबदारी अण्णा राजे व नीता तळपदे यांनी पार पाडली.



## बहुजन विद्यार्थी संघटनेतर्फे भोजनदान

**पाली/बेणसे :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर देशभरातून लाखो-भीमानुयायी ४ डिसेंबरपासूनच दादर येथील शिवाजी पार्क परिसरात येत असतात. त्यांची उपासमार होऊ नये म्हणून बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने (दि.६) डिसेंबर रोजी अन्नदान वाटप करण्यात आले. दादर आणि शिवाजी पार्क परिसरात हॉटेल बंद ठेवली जातात त्यामुळे आलेल्या सैनिकांची उपासमार होऊ नये यासाठी बहुजन विद्यार्थी संघटनेच्या भिवंडी शहराच्या वतीने १९९८ पासून सलग चैत्यभूमी वर अन्नदान केले जाते. बहुजन विद्यार्थी संघटनेचे भिवंडी शहर सरचिटणीस सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ॲड. निखिल उबाळे, ॲड. आप्पाराव मस्के, फय्याज मोमीन, नंदन अहिरे, योगेश इंदुलकर, अद्वैत वाणी, सम्यक वाणी महिला आघाडी निलम धावारे, निशा भोईर, सना मोमीन, वंदना सावकारे, राणी, जाधव, फिझा मन्सूर आलमास मोमिन यांनी अन्नदान वाटण्यास मोलाचे योगदान दिले.



## कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन

आगरदांडा : मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशन, एमओसी, कॅन्सर केअर ॲण्ड रिसर्च सेंटर पनवेल आणि टाटा कॅपिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस मोफत स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन मुरुड जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी याठिकाणी करण्यात आले. मेडिकल असोसिएशन सामाजिक बांधिलकी जपून अनेक सामाजिक उपक्रम राबवित आहेत, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, गरीब कुटुंबाना आर्थिक मदत असे विविध सामाजिक उपक्रम राबून जनसेवा करित असतो, यातून आम्हा सर्व डॉक्टरांना आनंद मिळत असतो असे डॉ. भाविका कल्याणी यांनी केले. यावेळी मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. संजय पाटील, डॉ.वसीम पेशीमम, डॉ. मंगेश पाटील, डॉ. राज कल्याणी, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. अमित बेनकर, विजय औटी, स्वप्नील बागल, सोनाली कुडाळकर, रुतुषा बामणे, प्रणाली बोराडे, डॉ. सदफ पेशीमम, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. अनंता जोशी, सुनील पटेल, डॉ. इप्सित पाटील, डॉ. हितेश जैन, डॉ. मकबुल कोकाटे, डॉ. रविंद्र जोशी, डॉ. केतकी पाटील, अंजली पाटील आदी उपस्थित होते.

# आगरी समाज हॉल परिसराला 'हुतात्मा हिराजी पाटील' असे नामकरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील हुतात्मे हिराजी गोमाजी पाटील यांना ब्रिटिश गोळीबारात आपले प्राण देशासाठी सोडावे लागले होते. त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतीकडून एका नागरी भागाला 'हुतात्मा हिराजी पाटील' आगरी समाज हॉल नगर असे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. कोल्हारे ग्रामपंचायतीकडून सरपंच महेश विरले यांनी हा ठराव मांडला असून त्या ठरावास सर्व ११ सदस्यांनी मंजुरी दिली आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतीकडून 'हुतात्मा हिराजी पाटील' यांचा अर्ध पुतळा तीन वर्षापूर्वी धामोते येथे नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर बसविण्यात आला होता. त्या परिसरात कर्जत तालुका आगरी समाज संघटनेकडून हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह उभारले आहे. त्याचवेळी तेथे उभारण्यात आलेल्या हॉलचे नाव आगरी समाज हॉल म्हणून परिचित आहे. ही बाब लक्षात घेऊन 'हुतात्मा हिराजी पाटील' सामाजिक सभागृह असलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकवस्ती उभी राहिली आहे. अनेक निवासी संकुले तेथे असून कोल्हारे ग्रामपंचायतीकडून सोमवार (दि.८) डिसेंबर रोजी झालेल्या मासिक मीटिंगमध्ये सरपंच विरले यांच्याकडून ठराव मांडण्यात आला. हुतात्मा हिराजी पाटील यांचा अर्ध पुतळा असलेला परिसर 'हुतात्मा हिराजी पाटील' आगरी समाज हॉल नगर म्हणून ओळखण्यात यावे अशा आशयाचा ठराव ग्रामपंचायतीमध्ये मांडण्यात आलेल्या ठरावाला सर्व ११ सदस्यांनी समर्थन दिले.



# रेशन दुकानदारांचे कमिशन रखडले

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील १९९ दुकानदारांपैकी १२० दुकानदारांचे कमिशन रखडले आहे. याबाबत रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते असोसिएशनने पुरवठा विभागाच्या उपायुक्तांना पत्र लिहून कमिशन वितरित करण्याची मागणी केली आहे. जून २०२५ पासून हे कमिशन दिलेले नाही. तालुक्यातील ५३ रास्त भाव धान्य दुकानदारांचे अद्ययावत प्रणालीद्वारे रजिस्ट्रेशन प्रलंबित असून, २६ दुकानदारांची माहिती प्राप्त नाही. याबाबत निर्णय घेण्याची विनंती अध्यक्ष भरत पाटील यांनी पत्राद्वारे केले आहे.

# बेवारस गाड्यांना लागली आग



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

करंजाडे सेक्टर ३ येथे सोमवार (दि.८) डिसेंबर रोजी सकाळी चार वर्षांपासून बेवारस पडलेल्या स्विफ्ट डिझायर आणि रिक्षाला आग लागली. परंतु, आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या सावधानतेमुळे लगेच अग्निशामक दलाला माहिती देऊन आग विझविण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साहेबराव दाते यांनी त्यांच्या घरातून अचानक लागलेल्या आगीची माहिती प्रथमेश पुंडे यांना दिली. त्यानंतर अग्निशामक दलाच्या मदतीने आग विझविण्यात आली.

अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी येऊन सदर आगेवर नियंत्रण मिळवले. गाडी मालकाचा शोध पोलीस करीत असून ही आग कशामुळे लागली असावी याचा शोध पोलीस करीत आहेत.

# मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**। उरण । प्रतिनिधी ।**

वीर वाजेकर महाविद्यालयात मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक अभ्यासक्रमाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात जेएनपीए हॉस्पिटल न्हावा शेवा येथील डॉ. वर्षा यादव यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास उपप्राचार्य गजानन चव्हाण, डॉ. राहुल पाटील उपस्थित होते. या अभ्यासक्रमासाठी बी.एस्सी. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रवेश घेतला आहे. अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील मूलभूत तंत्रज्ञान, तसेच पॅथॉलॉजी प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या विविध उपकरणांचे प्रत्यक्ष हाताळणीचे कौशल्य शिकविण्यावर आधारित आहे.



# माणगावमध्ये वारंवार वाहतूक कोंडी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्यापही पूर्णत्वास न गेल्याने तसेच माणगाव आणि इंदापूर येथील बायपास मार्ग सुरू न झाल्याने संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे. माणगाव, इंदापूर आणि लोणेरे शहरांमध्ये वाहनांची प्रचंड गर्दी होत असून त्याचा प्रचंड फटका प्रवासी, नागरिक आणि पोलिसांना बसत आहे. सततच्या कोंडीमुळे सर्वसामान्य जनता हैराण झाली आहे.

शनिवार (दि.६) डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी, लग्नसमारंभांची संख्या, शासकीय कार्यालये तसेच शाळा-कॉलेज बंद असल्याने दिवसभर वाहनांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळाली. परिणामी माणगाव शहरातील अनेक ठिकाणी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. रस्त्यातील कोंडी टाळण्यासाठी वाहनचालकांनी विविध पर्यायी मार्गांचा अवलंब केला. त्यामुळे खरवली, निजामपूर, रायगड रोड, बामणोली, मोरबा, दहिवली, गोरेगाव आदी भागातील अरुंद रस्त्यांवरही वाहनांची मोठी गर्दी झाली. कोंडी सुरळीत करण्यासाठी पोलिस कर्मचारी दिवसभर रस्त्यावर तैनात राहून अथक परिश्रम घेत होते. मात्र उपलब्ध पोलीस कर्मचारी अपुरे असल्याने काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे थांबली तर काही ठिकाणी वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढल्या. यामुळे पोलिसांवरही प्रचंड मानसिक ताण निर्माण होत आहे. सुट्टीच्या दिवशी आणि गर्दीच्या काळात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त वाढवावा, वाहतूक नियोजनात सुधारणा करावी आणि लवकरात लवकर बायपास मार्ग सुरू करण्याची मागणी स्थानिकांतून जोर धरत आहे.



**॥ प्रवासी,नागरिक, पोलीस हैराण**
**॥ वाहनांच्या लांबच लांब रांगा**

# कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीत क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल येथे सोमवार (दि.८) डिसेंबर रोजी डीएलएलई व एनएसएस विभागातर्फे क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा व वकृत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमासाठी डॉ. शिवदास कांबळे, प्राचार्य कल्पेश भोईर, के.डी. शारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेसाठी दिलेले स्वयंचलित विषय विद्यार्थीमित्र, सामाजिक भान जागवणारे होते. अन्न वाचवा, महिला सक्षमीकरण, सोशल मीडिया, पर्यावरणाचे रक्षण, माझे करिअर, आरोग्य सेवा, भारताचे संविधान, निवडणूक साक्षरता, ज्येष्ठ नागरिकांची काळजी आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी विचार व्यक्त केले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. तर प्रा. रुपाली अहिवले, प्रा. शुभांगी जोशी व प्रा. तेजल जाधव यांनी परीक्षक म्हणून परीक्षणाची जबाबदारी पार पाडली.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. चंद्रकांत मुकादम, प्रा. गीता कोरके व चेतना यांचेही विशेष सहकार्य लाभले. एकंदर कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला नवी दिशा देत ज्ञान, विचार आणि अभिव्यक्तीचा सुंदर संगम घडवून आणला होता.

# उरणमध्ये मोफत शिबिराचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण, जायंट्स ग्रुप ऑफ उरण व इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे मुंबई ओको केअर सेंटर (एमओसी) कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ( दि.८) रोजी मोफत मेमोग्राफी व पॅप्समेयर तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबीर बालरोग तज्ञ मोरे हॉस्पिटल आनंद नगर उरण येथे आयोजित केले होते. यावेळी उरणमधील डॉक्टर वेल्फेअर असोसिएशनचे डॉ. विकास मोरे, डॉ. कृष्णा बोरकर, डॉ. प्रदीप अटकरी, डॉ. सत्या ठाकरे, डॉ. मोना बोरकर डॉ. अजय कोळी डॉ. घनश्याम पाटील इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे आदी मान्यवर डॉक्टरांच्या उपस्थितीत मेमोग्राफी शिबीर सोहळ्याचे उद्घाटन पार पडले. शिबिरात ३० लाभार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमासाठी संगीता ढेरे श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण अध्यक्षा, कविता म्हात्रे, वैशाली पाटील, मीना रावल, अभया म्हात्रे, तृप्ती भोईर, सुप्रिया सरफरे, प्रियवंदा तांबटकर, देवेंद्र पिंपळे, रोशनलाल मेहता यांचे योगदान लाभले.




## तीन ते चार वर्षापासून प्रवाशांची होतेय गैरसोय | मार्ग लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी

# उड्डाण पुलामुळे वाघधोंडी मार्ग बंद

**। चिरनेर। प्रतिनिधी ।**

**उरण पूर्व विभागातील चिरनेर दिघोडे या मार्गावरून पनवेलला जाण्यासाठी या मार्गावरील वाघधोंडी मार्ग गव्हाण फाट्यालगत बंद असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सदर मार्ग लवकरात लवकर सुरू करावा अशी मागणी प्रवाशांमधून जोर धरू लागली आहे.**

आवरे, गोवठणे, खोपटे, कोप्रोली, सारडे, वशेणी, चिरनेर, दिघोडे या विभागात येणाऱ्या गावातील प्रवाशांसाठी या मार्गाचा वापर गेल्या अनेक दशकापासून अविरतपणे चालू होता. परंतु, वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी येथे गव्हाण फाट्याजवळ उड्डाण पुलाचे काम गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. वाघधोंडी मार्ग म्हणजे छोटे खाणी घाटमार्ग असल्याने याला नैसर्गिक महत्त्व होते. परंतु येथील अविकसित विकास कामामुळे या भागाची भौगोलिक रचना बदलली गेली आहे. सदर मार्ग लवकरात लवकर सुरू करण्यात यावा अशी मागणी आता जोर धरू लागली असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान एकेकाळी उरणच्या पूर्व व पश्चिम भागातील जनतेला पनवेलला जाण्यासाठी या मार्गावरून जलद प्रवास करता येत होता. परंतु सदर मार्ग गेल्या तीन ते चार वर्षांपासून बंद असल्याने या मार्गावरून लालपरी एसटी जी एका तासाने पनवेल येथे पोहोचत होती. त्या एसटीला पोहोचायला आता जास्त वेळ लागत असल्याचे प्रवाशांकडून सांगितले जात आहे.

त्याचबरोबर याच मार्गावरील वेश्वी, जांभूळपाडा या गावांचा एसटीचा तेव्हापासून संपर्क तुटला असून, येथील जनतेला जास्त पैसे मोजून प्रवास करावा लागत आहे. वाघधोंडीचा मार्ग म्हणजे एक अल्हादायक प्रवासाचा आनंद देणारा मार्ग होता. पावसाळी दिवसात तर एक वेगळाच अनुभव एसटीच्या खिडकीतून डोकावताना येत होता. तर थंडीच्या हंगामात वारा अंगाला झोंबत होता. मात्र, गेल्या तीन ते चार वर्षापासून सदर मार्ग बंद असल्याने हा अनुभव आता अनुभवता येत नसल्याचे प्रवासी अस्मित ठाकूर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले. हा मार्ग लवकरात लवकर सुरू करण्यात यावा अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या अनेकांनी केली आहे.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संर्पक - ९८२३५८५३२१
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती मधुन कायम स्वरूपी वहिवाटीचा रस्त्या संदर्भात विद्यमान मालक यांचे सोबत वहिवाटीचा करार नोंदणीकृत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता.अलिबाग | २३१ | वरकस ०-०४-१०<br>पो.ख. क्षेत्र ०-०२-००<br>एकुण क्षेत्र ०-०६-१० | ०.०६ |

वर वर्णन जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रा पैकी रस्त्याकरीता १५५ चौ. मीटर क्षेत्र (९ मीटर रूंदीचा) सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक कमळाकर आत्माराम काठे, अशोक आत्माराम काठे, माधुरी मधुकर काठे, आदेश मधुकर काठे, अभय मधुकर काठे, कै.संदेश मधुकर काठे तर्फे वारस सुविधा संदेश काठे, हर्ष संदेश काठे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदर रस्त्याबाबत व्यवहार ठरविणेपूर्वी खातरजमा करणेसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा,वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर वहिवाटीचा करारनामा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०८/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र ( हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| मान तर्फे झिराड, ता.अलिबाग | ६८/१ | ०-१६-००<br>पो. ख. ०-०३-००<br>एकुण क्षेत्र ०-१९-०० | ०.८० |

अलिबाग,
दिनांक- ०९/१२/२०२५

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

पत्ता - कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा- ठाणे
ईमेल-eemsddkalwa@yahoo.co.in दुरध्वनीक्र २५३७४७७०-०२२.

**ई निविदा सूचना क्र. ३६ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा- ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील अ.क्र.१ ते ३ कामाकरिता ई-निविदा B-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. अ. क्र. ४ ते ५ कामाकरिता B -१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ : http://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | वरंध ल.पा.तलाव ता.:-महाड जि. रायगड येथील सिंचन विमोचक सेवाद्वार आकार १.२X१.२ मी.-१ नग उ स्क्रू स्टेम उच्चालक १२ मे.टन देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक यांत्रिकी कामे. |
| | निविदेची किंमत रुपये | रु.२१,२८,०५५/- |
| २ | कामाचे नांव | खिंडवाडी ल.पा.तलाव ता.:-महाड जि. रायगड येथील सिंचन विमोचक सेवाद्वार आकार १.२X १.२ मी.- १ नग उ स्क्रू स्टेम उच्चालक ८ मे.टन देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक यांत्रिकी कामे. |
| | निविदेची किंमत रुपये | रु.२२,५७,४९५/- |
| ३ | कामाचे नांव | रानिवली ल.पा. तलाव ता.:-श्रीवर्धन जि.रायगड येथील सिंचन विमोचक सेवाद्वार आकार १.२X १.२ मी.-१ नग उ स्क्रू स्टेम उच्चालक ८ मे.टन देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक यांत्रिकी कामे. |
| | निविदेची किंमत रुपये | रु.२०,८३,५५९/- |
| ४ | कामाचे नांव | कुडकी ल.पा.योजना ता.:-श्रीवर्धन जि.रायगड येथील ९०० मी. मी. Valve आकाराचा व उच्चालक दुरुस्ती कामे |
| | निविदेची किंमत रुपये | रु.७,८२,५४६/- |
| ५ | कामाचे नांव | कार्ले ल. पा. योजना ता.:- श्रीवर्धन जि.रायगड येथील ९०० मी.मी. Valve आकाराचा व उच्चालक दुरुस्ती कामे |
| | निविदेची किंमत रुपये | रु.७,७१,५८२/- |

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : १२/१२/२०२५ ते दिनांक: १९/१२/२०२५ |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक : २२/१२/२०२५ |

जा.क्र.यांभाविवि/लेशा-२/२६६६/सन-२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा- ठाणे.
दिनांक- ०४/१२/२०२५

सही/-
**(सं.ना.रोकडे)**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी भांडार व विकास विभाग**
**कळवा-ठाणे**

**विमाका/क्रोवि/२०२५-२०२६/२३९**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता.अलिबाग येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत १. श्री.अल्ताफ अमीर घट्टे, २. गनी तमीज बागवान, ३. शाहीद शौकत खान, ४.श्री. हमीद तमीज बागवान रा.अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदरील जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलादरम्यान झालेली आहे. सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लीएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|
| थळ, ता. अलिबाग जि.रायगड | १५८/२ | ०-३४-९०<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-३५-९० | ७.८१ |

वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री.अल्ताफ अमीर घट्टे वगैरे ३ यांच्या मालकीचे ०-२८-९० हे.आर.पो.ख.०-०१-०० हे.आर. एकूण क्षेत्र ०-२९-९० हे.आर. मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक :- ०८-१२-२०२५

सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती मधुन कायम स्वरूपी वहिवाटीचा रस्त्या संदर्भात विद्यमान मालक यांचे सोबत वहिवाटीचा करार नोंदणीकृत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता.अलिबाग | २३० | जिरायत ०-०४-६०<br>वरकस ०-००-६०<br>पो.ख. क्षेत्र ०-०१-४०<br>एकुण क्षेत्र ०-०६-६० | १.०० |

वर वर्णन जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रा पैकी रस्त्याकरीता १४० चौ. मीटर क्षेत्र (९ मीटर रूंदीचा) सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक नंदा नंदकुमार ठाकुर, राकेश नंदकुमार ठाकुर, रोहन नंदकुमार ठाकुर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदर रस्त्याबाबत व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर वहिवाटीचा करारनामा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०८/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-भुतिवली, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉं. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) अनंता भागा तावरे<br>२) प्रमोद विष्णू तावरे<br>३) मारूती विष्णू तावरे<br>४) सुलोचना विष्णू तावरे | ३० | ३ | एकूण क्षेत्र ०-५६-७०<br>त्यापैकी लिहून दिलेले<br>क्षेत्र ०-१६-०० हे.आर.पॉ | ६-१० |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. ९/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## तहसिलदार सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र. /२०२५

श्री. रविंद्र कृष्णा शिंदे, रा. नाडसुर बोधिग्राम ता. सुधागड जि. रायगड — वादी

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत नाडसूर ता. सुधागड. जि. रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. रविंद्र कृष्णा शिंदे, रा.नाडसुर बोधिग्राम ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वत:चा जन्म दि.२९/११/१९६९ रोजी मौजे नाडसूर बोधिग्राम ता. सुधागड जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर रविंद्र कृष्णा शिंदे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- १९/११/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

मौजे-भिसराई, ता. अलिबाग, येथील गट नंबर ४१, क्षेत्र ०-३९-२० हे. आर., पो. ख. ०-०२-६० हे. आर. एकुण क्षेत्र ०-४१-८० हे.आर., आकार १०.६० रू.पैसे (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत 'सदर मिळकत' असा उल्लेख केलेला आहे) या मिळकतीचे विद्यमान मालक १) परशराम चंदर सुतार २) योगीता बाळाराम सुतार ३) आशिर्वाद बाळाराम सुतार ४) रविना राजेंद्र पाटील ५) शिवानी विश्वजीत घरत ६ ) वनिता गणेश चवरकर ७) अपर्णा प्रकाश पाटील ८) सुनील कृष्णा थळे ९) सुवर्णा संदीप जुईकर १०) दिक्षीता दिपक पाटील ११) नरेश शांताराम पाटील १२) प्रभाकर शांताराम पाटील १३) हेमंत शांताराम पाटील १४) कविता कैलास माने १५) अनिता अनिल थळे १६) उत्तमा नवनाथ पाटील १७) वृंदा देवेंद्र धसाडे १८) जयवंत शांताराम पाटील १९) सुगंधा नामदेव पाटील २०) शरद हरश्चिंद्र शिंगरूत २१) संजय हरश्चिंद्र शिंगरूत २२) संदिप हरश्चिंद्र शिंगरूत २३) अपर्णा आत्माराम घरत २४) निलेश नरेश थळे २५) नमिता प्रमोद पाटील २६) निशा दिनेश हळदणकर २७) नंदा सिताराम सुतार २८) कुंदा सुधीर वळवईकर २९) तुकाराम रामभाऊ पाटील ३०) मधुकर रामभाऊ पाटील ३१) सुनिता रविंद्र थळे ३२) संगिता हिराजी थळे ३३) वनिता दत्ताराम पाटील ३४) मनोज दत्ताराम पाटील ३५) गिता दत्ताराम पाटील ३६) अमिता अनंत थळे ३७) हितेंद्र अनंत थळे ३८) विशाल दत्तात्रेय घरत ३९) रिया राजेश थळे सर्व रा. मु. परहुरपाडा, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड. यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे.

याउपरही सदरहू मिळकतीत विद्यमान मालक यांचेशिवाय इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, कोर्ट हुकुम, मुखत्यारपत्र, खरेदी, लीज, लीन, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात मूळ कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व निजोखमी आहे किंवा संबंधीतांनी त्यांचे असलेले हक्क व हितसंबंध अधिकार जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख :- ०८-१२-२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे धोंडसे, ता.सुधागड,जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | सं..नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. विशाल कृष्णा कोळी. | ७६/५ | ०-५१-८० | ०३-२४ |
| श्री. गुरूनाथ पद्माकर कोळी.<br>श्री. बळीराम पद्माकर कोळी. | ७६/५ | ०-५०-० | ०३-०१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, ही संबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०९/१२/२०२५

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे नांदगाव, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत..**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | सं..नं./ गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री.संतोष गंगाधर देशमुख.<br>श्री.संदीप गंगाधर देशमुख.<br>श्रीम.निशा प्रदीप पारसनिस. | २०५<br>१४९ | ०-९३-०<br>०-२८-८० | ०-२६<br>४-३६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०९/१२/२०२५

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसाने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. निहार रमाकांत म्हात्रे रा-मोहन लॉज जवळ, सम्राट अशोग नगर, बोर्ला गोवंडी, ट.फ.देवनार स.ओ, मुंबई यांनी जमिन मालक श्री.मिलिंद दत्तात्रेय म्हात्रे, रा-मू.पो.बेणेघाट, ता.पेण, जि. रायगड यांचेकडून खाली वर्णन केलेली जमिन मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| गांव | गट क्र. व उपविभाग | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| इंद्रनगर | २२ | ४/अ | ०.३२.९०<br>पो.ख. ०.०४.१०<br>एकूण क्षेत्र ०.३७.०० | ९.१३ |

वर वर्णन केलेल्या संपूर्ण जमिन मिळकत पैकी श्री.मिलिंद दत्तात्रेय म्हात्रे यांचे हिश्याचे क्षेत्र ०.०९.२० हे.आर आकार २.४६ पैकी ०.०३.२० हे.आर ही जमिन मिळकत आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेत आहेत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज, कोर्ट मॅटर अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०९/१२/२०२५

सही/-
**ॲड.उमेश वामन पाटील**
पत्ता-मु.पो.कांदळेपाडा ता.पेण,जि.रायगड
मो.९८२२६२६११८

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील १) फसुबाई सखाराम विरले रा. धामोते, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०१०१ यांनी खालील नमूद बिनशेती जमीन मिळकत त्याचे मालक एन एन सन्स रियालिटी भागीदारी संस्था तर्फे भागीदार १) नित्यानंद के शर्मा रा. बी. २६, त्रिवेणी नगर, पोद्दार हायस्कुल जवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे, भाईंदर ४०११०१. २) यात्रिक एन उणडकर सर्व रा.सी ४०२, सोनी पार्क, चिकुवाडी, जॉगर पार्कच्या जवळ, बोरिवली पश्चिम ४०००९२. यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे धामोते ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र आर- चौ.मी. | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|---|
| ११२ | १२ | ३.२५.०० | ३२.५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक ९ डिसेंबर २०२५

**अधिवक्ता संदीप एकनाथ विरले**
ऑफीस नं. २, पहिला मजला, श्रीसमर्थ पॅराडाईज, गंगा नगरच्या समोर, नेरळ कळंब रोड, नेरळ (पूर्व), ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मोबाईल नं. ९०२९७६८८९७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती मधुन कायम स्वरूपी वहिवाटीचा रस्त्या संदर्भात विद्यमान मालक यांचे सोबत वहिवाटीचा करार नोंदणीकृत करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| कामथ ता.अलिबाग | २२९ | जिरायत ०-११-४०<br>वरकस ०-०२-००<br>पो.ख. क्षेत्र ०-००-८०<br>एकुण क्षेत्र ०-१४-२० | २.८१ |

वर वर्णन जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रा पैकी रस्त्याकरीता ३०० चौ. मीटर क्षेत्र (९ मीटर रूंदीचा) सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक कृष्णा गणपत काठे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदर रस्त्याबाबत व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवंसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर वहिवाटीचा करारनामा नोंदणीकृत करतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०८/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणगांव | २५२ | १-२१-९०<br>पो. ख. ०-०३-८०<br>१-२५-७० | १२.१२ |

**पैकी श्रीम. शर्मिला सदानंद कवठेकर यांच्या मालकीची ० हे. १६.७० आर एवढी मिळकत**

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०९/१२/२०२५

**अँड विधान अरविंद पाटील,**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९४२२३७५११५

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### ठाणे हाफ मॅरेथॉनमध्ये ऋतुजा प्रथम



**पाली/गोमाशी :** दोस्ती सोसायटीच्या वतीने रविवारी (दि. ७) दोस्ती ठाणे हाफ मॅरेथॉन पर्व चारचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १५ ते ३० वयोगटात ऋतुजा राजू पातेरे ही प्रथम आली. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरावरून कौतुक करून अभिनंदन केले जात आहे.

### श्रेयस, अक्षतची महाराष्ट्र संघात निवड

**नाशिक :** १७ वर्षांच्या आतील मुलांच्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या नाशिक जिमखान्याचे खेळाडू आणि एसएसके पब्लिक स्कुलचे विद्यार्थी श्रेयस हेकरे आणि अक्षत भांडारकर या दोघांची महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड झाली आहे. हे दोघेही खेळाडू तेलंगणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात महाराष्ट्राच्या संघाकडून खेळणार आहेत. शिर्डी येथे झालेल्या १७ वर्षांच्या आतील मुलांच्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत नाशिक विभाग विरुद्ध पुणे विभाग या दोघांमध्ये अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. या सामन्यात एसएसके पब्लिक स्कुलकडून खेळताना नाशिक संघाला उपविजेतेपद मिळाले. परंतु उपविजेत्या संघातून नाशिक जिमखान्याच्या अक्षत आणि श्रेयसची महाराष्ट्र संघासाठी निवड करण्यात आली. मागील काही वर्षात नाशिकचे उदयोन्मुख खेळाडू विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. मध्यंतरी नाशिकचा अष्टपैलू रणजीपटू सत्यजित बच्छाव, १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघाची कर्णधार ईश्वरी सावकार आणि युवा खेळाडू साहिल पारख यांना महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने २०२२ वर्षासाठीच्या सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू पुरस्काराने गौरविले होते. तेव्हा सत्यजितची महाराष्ट्र संघात सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेसाठी निवड झाली होती. तर ईश्वरी सावकारची १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघाची कर्णधार, चॅलेंजर चषकासाठी महाराष्ट्रच्या वरिष्ठ महिला संघात, नंतर १९ वर्षाखालील चॅलेंजर स्पर्धेसाठी इंडिया ए संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली. साहिल पारखची १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघात २०२३-२४ च्या विनू मंकड करंड स्पर्धेसाठी निवड झाली होती.

### वेदांत शिंदे द व्हेली रन स्पर्धेत प्रथम

**रसायनी :** लोणावळा येथील आंबिवली या ठिकाणी दि फेडरेशन ऑफ मोटार स्पोर्ट क्लब ऑफ इंडीया यांनी आयोजित केलेली पुरस्कृत द व्हेली रन स्पर्धा २०२५ या एका चाकावर



जास्तीत जास्त जोरात ५५० सीसीची मोटार सायकल चालविण्याचे स्पर्धेमध्ये रसायनीतील रिस येथील वेदांत शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. वेदांतने देशभरातील स्पर्धकात प्रथम येवून रायगड जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. या स्पर्धेमध्ये भारतातील अनेक स्पर्धकांनी भाग घेतला होता. वेदांत याने एका चाकावर कमी वेळात ४०० मीटर अंतर १४ सेकंदामध्ये पार करुन स्पर्धा जिंकली आहे. वेदांत हा पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिंदे व प्रिया स्कुल मोहोपाडा येथील शिक्षिका निशा शिंदे यांचा चिरंजीव आहे.त्याच्या यशाबद्दल वेदांतवर सर्व थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### टीम इंडियाचा विक्रम स्पेनने मोडला

**नवी दिल्ली :** टीम इंडियाचा ट्वेंटी-२० क्रिकेटमधील एक मोठा विक्रम स्पेनने मोडला आहे. स्पेन हा फुटबॉल विश्वातील दादा देश ओळखला जातो, परंतु आता ट्वेंटी-२०तही त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण करण्यास सुरूवात केली आहे. सामन्यात एक मोठा विक्रम पाहायला मिळाला. मोहम्मद इहसानच्या ६३ चेंडूंत ५ चौकार व १७ षटकारांसह १६० धावांच्या वादळी खेळीने स्पेनला ३ बाद २९० धावांचा डोंगर उभारून दिला. हमझा दारने २९ चेंडूंत नाबाद ९१ धावा चोपल्या आणि त्यात १ चौकार व १२ षटकारांचा समावेश होता. प्रत्युत्तरात क्रोएशिया फक्त ८ बाद ७५ धावा करू शकला आणि स्पेनने २१५ धावांनी हा सामना जिंकला.धावांच्या फरकाच्या बाबतीत हा पाचवा मोठा विजय ठरला. स्पेनने ३ बाद २९० धावांसह आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-२०त सर्वाधिक धावा करणाऱ्या संघांमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे. यासह त्यांनी भारताचा १ बाद २८३ धावांचा विक्रम मोडला.

# ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडविरुद्ध विजय

**| ब्रिस्बेन | वृत्तसंस्था |**

ॲशेस २०२५ - २६ या मालिकेतील दुसरा कसोटी सामना दिवस-रात्र प्रकारात ब्रिस्बेनमधील गॅबा स्टेडियमवर खेळवला गेला होता. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्ध ८ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. त्यामुळे पाच सामन्यांच्या या प्रतिष्ठीत कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाने २-० अशी आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने पहिल्या कसोटी सामन्यातही ८ विकेट्सने विजय मिळवला होता. या दोन्ही सामन्यात ऑस्ट्रेलियासाठी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क हिरो ठरला आहे.



दरम्यान ही ॲशेस मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२७ स्पर्धेचाही (२०२५-२७) भाग असल्याने दुसऱ्या सामन्यानंतर पॉइंट्स टेबलमध्येही बदल झाले आहेत. ऑस्ट्रेलियाने हा सामना जिंकल्याने अव्वल स्थान आणखी भक्कम केले आहे. ऑस्ट्रेलिया अद्याप २०२५-२७ स्पर्धेत एकही पराभव स्वीकारलेला नाही. ऑस्ट्रेलियाने २०२५-२७ स्पर्धेत ५ सामने खेळले असून पाचही सामने जिंकले आहेत. त्यामुळे त्यांचे १०० टक्केवारी आहे.

मात्र इंग्लंडची टक्केवारी घसरली असून ते आता सातव्या क्रमांकावर घसरले आहेत. इंग्लंडने ७ सामने आत्तापर्यंत खेळले असून २ सामने जिंकले असून ४ पराभव स्वीकारले आहेत. १ सामने अनिर्णित राहिला आहे. तसेच त्यांचे षटकांची गती कमी राखल्याने २ गुण कापण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांची टक्केवारी ३०.९५ झाली आहे. इंग्लंड

### ■ मिचेल स्टार्क पुन्हा चमकला

सातव्या क्रमांकावर घसरल्याने न्यूझीलंड सहाव्या क्रमांकावर गेले आहेत. न्यूझीलंडने आद्याप एकच सामना खेळला असून तो अनिर्णित राहिला आहे. त्यामुळे त्यांचे ३३.३३ टक्केवारी आहे. इंग्लंडच्या खाली बांगलादेश (१६.६७ टक्केवारी) आठव्या आणि वेस्ट इंडिज (५.५६) नवव्या क्रमांकावर आहे.

दरम्यान, ऑस्ट्रेलियापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर दक्षिण आफ्रिका ७५ टक्केवारीसह आहे. त्यांनी ४ सामन्यांतील ३ विजय मिळवले आहेत, तसेच १ सामना पराभूत झाला आहे. तिसऱ्या क्रमांकावर श्रीलंका (६६.६७ टक्केवारी) आहे, तर पाकिस्तान (५० टक्केवारी) चौथ्या क्रमांकावर आहे. भारतीय संघ पाचव्या क्रमांकावर आहे. भारताने ९ सामन्यांतील ४ विजय आणि ४ पराभव स्वीकारले आहेत. १ सामना अनिर्णित राहिला आहे. भारताचे ४८.१५ टक्केवारी आहे.. ऑस्ट्रेलियाचा दुसऱ्या सामन्यात विजयदरम्यान, द गॅबावर झालेल्या दुसऱ्या ॲशेस सामन्यात इंग्लंडने पहिल्या डावात सर्वबाद ३३४ धावा केल्या आहेत. या डावात जो रुटने नाबाद १३८ धावा केल्या, तर झॅक क्रावलीने ७६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने ६ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात सर्वबाद ५११ धावा केल्या आणि १७७ धावांची आघाडी घेतली. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक ७७ धावांची खेळी केली, तर जेक वदरल्डने ७२ धावांची खेळी केली. तसेच मार्नस लॅब्युशेन (६५), स्टीव्ह स्मिथ (६१) आणि ॲलेक्स कॅरे (६३) यांनी अर्धशतके केली. इंग्लंडकडू गोलंदाजी करताना ब्रायडन कार्सने ४ विकेट्स घेतल्या.

दुसऱ्या डावात इंग्लंडला २४१ धावाच करता आल्या. कर्णधार बेन स्टोक्सने ५० धावांची खेळी केली, तर झॅक क्रावलीने ४४ धावांची, तर विल जॅक्सने ४१ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून मायकल नासिरने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. स्टार्क आणि स्कॉट बोलंड यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. इंग्लंडने पहिल्या डावात १७७ धावांची पिछाडी स्वीकारल्याने त्यांना ऑस्ट्रेलियासमोर ६५ धावांचेच लक्ष्य ठेवता आले. हे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने १० षटकात २ बाद ६९ धावा केल्या आणि विजय मिळवला. ट्रॅव्हिस हेडने २२ चेंडूत २२ धावा केल्या. तसेच स्टीव्ह स्मिथने ९ चेंडूत नाबाद २३ धावा केल्या, तर जेक वेदरल्डने नाबाद १७ धावांची खेळी केली.

## अलिबागचा सॅन्डी वॉटर स्पोर्ट संघ विजेता

**| चणेरा | प्रतिनिधी |**

दत्त जयंतीच्या औचित्याने सागर सम्राट क्रिकेट संघ, न्हावे यांच्या वतीने पर्व ४० वे आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसभर चाललेल्या या रोमांचक स्पर्धेत परिसरातील विविध संघांनी सहभाग नोंदवून आपली उत्तम क्रिकेटकौशल्ये सादर केली. छोटेखानी पण तुलनेने तुफानी अशा दोन षटकांच्या सामन्यांमुळे प्रेक्षकांना सतत उत्कंठावर्धक क्षण अनुभवायला मिळाले.



**सागर सम्राट न्हावे आयोजित क्रिकेट स्पर्धा**

अंतिम सामना सॅन्डी वॉटर स्पोर्ट अलिबाग विरुद्ध खेडेकर इलेव्हन तळेखार यांच्यात खेळविण्यात आला. नाणेफेक जिंकताच सॅन्डी वॉटर स्पोर्ट संघाने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यांच्या गोलंदाजांनी उत्तम मारा करत प्रतिस्पर्धी खेडेकर इलेव्हन संघाला मर्यादित ९ धावांवर रोखले. विजयासाठी केवळ १० धावांचे छोटे पण तणावपूर्ण लक्ष्य असताना अलिबाग संघाने आक्रमक फलंदाजी करत फक्त एका षटकात हे लक्ष्य गाठले आणि स्पर्धेचा अंतिम विजेता म्हणून ट्रॉफीवर आपले नाव कोरले. विजयानंतर अलिबागच्या समर्थकांमध्ये आनंदाचा जल्लोष उसळला.

स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सागर सम्राट, न्हावे ब संघाने तृतीय क्रमांक पटकावला, तर आर. बी. सी. चणेरा संघाने चतुर्थ क्रमांक मिळवत आपली दमदार उपस्थिती नोंदवली. विजेत्या चारही संघाना भव्य ट्रॉफी व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. सर्व संघांनी खेळात दाखवलेल्या शिस्तबद्धतेचे आणि क्रीडाभावाचे उपस्थितांनी कौतुक केले.

विजय घाणेकर यांना संपूर्ण स्पर्धेत सर्वांगीण उत्कृष्ट खेळ केल्याबद्दल मालीकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. अंतिम सामन्यात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या आयुष बोकाडे याला उत्कृष्ट कामगिरीसाठी सामनावीर म्हणून सन्मानित करण्यात आले.

दत्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित ही स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध, उत्साहवर्धक आणि सकारात्मक वातावरणात पार पडली. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आयोजक सागर सम्राट क्रिकेट संघ, न्हावे यांनी सर्व खेळाडू, समालोचक, पंच, प्रेक्षक तसेच सहयोगी मंडळींचे मनः पूर्वक आभार मानले. स्पर्धेत समालोचनाची जबाबदारी दशरथ पाटील, याशीन मर्चंड, प्रदिप भोईर, हरेश दिघीकर, सादीक रोगे व उपेश तांडेल यांनी सांभाळली. तर पंच म्हणून कल्पेश म्हात्रे आणि नितेश नरहरी यांनी अचूक निर्णय देत सामने सुरळीत पार पाडले. गुणलेखनाची जबाबदारी धर्णे गुरुजी यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली. दत्त जयंतीनिमित्त रंगलेल्या या स्पर्धेने स्थानिक पातळीवर क्रिकेटप्रेमींसाठी एक संस्मरणीय क्रीडा पर्व ठरविले.

## सूर्यासेना टी २० मालिकेसाठी सज्ज

**| मुंबई | प्रतिनधी |**

टीम इंडिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात एकदिवसीय मालिका खेळवण्यात आली. टीम इंडियाने केएल राहुल याच्या नेतृत्वात २०२३ नंतर पुन्हा एकदा दक्षिण आफ्रिकेचा वनडे सीरिजमध्ये २-१ ने धुव्वा उडवला. त्यानंतर आता टीम इंडिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात टी २० मालिकेचा थरार रंगणार आहे. या मालिकेत एकूण ५ टी २० सामने खेळवण्यात येणार आहेत.

सूर्यकुमार यादव दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी २० सीरिजमध्ये टीम इंडियाचं नेतृत्व करणार आहे. तर एडन मार्क्रम याच्याकडे दक्षिण आफ्रिकेच्या नेतृत्वाची धुरा आहे. टी २० मालिकेचं आयोजन हे ९ ते १९ डिसेंबर दरम्यान करण्यात आलं आहे.उभयसंघातील एकदिवसीय सामन्यांना दुपारी दीड वाजता सुरुवात व्हायची. तर १ वाजता टॉस व्हायचा. मात्र आता टी २० सामने आहेत. त्यामुळे या सामन्यांना संध्याकाळी सुरुवात होणार आहे. सामन्याला ७ वाजता सुरुवात होईल. तर ६ वाजून ३० मिनिटांनी टॉस करण्यात येईल.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी २० सीरिजद्वारे टीम इंडियात ऑलराउंडर हार्दिक पंड्या याचं कमबॅक झालं आहे. हार्दिक पंड्या याला टी २० आशिया कप २०२५ स्पर्धेदरम्यान दुखापत झाली होती. हार्दिक तेव्हापासून टीम इंडियातून बाहेर होता.

**टी २० मालिकेचं वेळापत्रक**

पहिला सामना, ९ डिसेंबर, कटक, बाराबती स्टेडियम
दुसरा सामना, ११ डिसेंबर, मुल्लानपूर
तिसरा सामना, १४ डिसेंबर, धर्मशाला
चौथा सामना, १७ डिसेंबर, लखनौ
पाचवा सामना, १९ डिसेंबर, अहमदाबाद

## ज्युनियर हॉकी विश्वचषक उपांत्य फेरीत भारताचा पराभव

**अर्जेंटिनाविरुद्ध कांस्यपदकासाठी सामना**

**| चेन्नई | वृत्तसंस्था |**

चेन्नई येथील मेयर आर.आर. स्टेडियमवर रविवारी खेळल्या गेलेल्या मेन्स ज्युनियर हॉकी वर्ल्ड कप २०२५ च्या उपांत्य फेरीत, गतविजेत्या जर्मनीने भारताचा ५-१ असा पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले.हा सामना जगातील नंबर-१ आणि नंबर-२ ज्युनियर संघांमध्ये होता, परंतु जर्मनीने सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामन्यात आघाडी कायम ठेवली.

सुरुवातीला भारताने काही काळ चांगली कामगिरी केली. गोलकीपर प्रिन्स दीप सिंगने सुरुवातीच्या मिनिटांत तीन महत्त्वाचे बचाव केले. १३व्या मिनिटाला जर्मनीला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. ड्रॅग फ्लिक भारतीय खेळाडू अंकित पालला लागल्यानंतर पंचांनी पेनल्टी स्ट्रोक दिला, जो लुकास कोसेलने गोलमध्ये बदलून जर्मनीला १-० अशी आघाडी मिळवून दिली.फक्त ६८ सेकंदांनंतर टायटस वेक्सचा शॉट भारतीय बचावपटू सुनील पालक्षप्पाच्या पायाला लागून गोलमध्ये गेला आणि स्कोअर २-० झाला. दुसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीलाच कोसेलने आणखी एका पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून आघाडी ३-० अशी केली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये जोनास वॉन गर्सम आणि बेन हासबाखने आणखी दोन गोल केले, त्यानंतर स्कोअर ५-० असा झाला. चौथ्या क्वार्टरमध्ये सुमारे १० मिनिटे बाकी असताना भारताला पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला.

## भारताच्या अमित पासीचा टी-२० पदार्पणात वर्ल्ड रेकॉर्ड

नवी दिल्ली : सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये भारताचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. टीम इंडियामध्ये संधी मिळालेले आणि इतर युवा खेळाडू आपल्या कामगिरीने सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. वैभव सूर्यवंशीपासून ते अगदी अनुभवी खेळाडू अजिंक्य रहाणेपर्यंत सर्वच जण लक्षवेधी कामगिरी करत आहेत. यादरम्यान बडोदाच्या एका खेळाडूने पदार्पणाच्या सामन्यातच विश्वविक्रम केला आहे. बडोदा व सर्विसेस या संघांमध्ये सय्यद मुश्ताक अली स्पर्धेतील सामना खेळवला गेला. या सामन्यात बडोदाकडून यष्टीरक्षक फलंदाज अमित पासीला पदार्पणाची संधी मिळाली. त्याने पदार्पणाच्या सामन्यात उत्कृष्ट शतक झळकावलं.

## अभिषेक शर्माचा टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

अभिषेक शर्मा टी-२० क्रिकेटमध्ये यंदा वादळी फॉर्मात आहे. सलामीला उतरत आक्रमक फलंदाजी करत गोलंदाजांवर हल्ला बोल करत खेळण्यात त्यांचा हातखंडा आहे. आयपीएल, भारत टी-२० संघ याचबरोबर त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात आपल्या कामगिरीचा जलवा कायम ठेवला. अभिषेक शर्माने टी-२० क्रिकेटमध्ये अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे. आयपीएल २०२४ मध्ये सनरायझर्स हैदराबादसाठी खेळताना आपल्या आक्रमक फलंदाजीने प्रसिद्धी मिळवणारा अभिषेक शर्मा आपल्या गगनचुंबी षटकारांसाठी ओळखला जातो.



सर्वात जलद शतक आणि सर्वात जलद १ हजार टी आंतरराष्ट्रीय धावा असे मोठे विक्रम आपल्या नावे केल्यानंतर, अभिषेकने आता आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. २०२५ मध्ये, अभिषेकने टी २० फॉरमॅटमध्ये १०० हून अधिक षटकार मारण्याचा विक्रम आपल्या नावे केला आहे. ६ डिसेंबरला झालेल्या सर्व्हिसेसविरुद्ध सय्यद मुश्ताक ट्रॉफी सामन्यात पंजाबकडून सलामीला येताना त्याने तीन षटकार मारले. यासह, अभिषेक फक्त ३६ टी-२० डावात एका वर्षात सर्वाधिक १०१ षटकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज बनला.

अभिषेकने या बाबतीत स्वतःचाच विक्रम मोडला आहे. त्याने २०२४ मध्ये टी-२० क्रिकेटमध्ये एकूण ८७ षटकार लगावले होते, जे एका वर्षात एका भारतीय खेळाडूने मारलेले सर्वाधिक षटकार आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव आहे, ज्याने २०२२ मध्ये ८५ षटकार लगावले होते. अभिषेकने या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४७ षटकार लगावले आहेत. या वर्षी त्याने फक्त १७ डावांमध्ये ४७ षटकार मारले आहेत. शिवाय, आयपीएल २०२५ मध्ये त्याने १४ डावांमध्ये २८ षटकार मारले. अशाप्रकारे, टी-२० आंतरराष्ट्रीय आणि आयपीएलमध्ये ७५ षटकार मारल्यानंतर, अभिषेकने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये २६ षटकार मारले. पंजाबच्या कर्णधाराने फक्त सहा डावांमध्ये २६ षटकार मारत १०० षटकारांचा आकडा गाठला.

**प्रश्न विचारणाऱ्यांना बॅटने दिले उत्तर | फलंदाजांमध्ये दोघे अव्वल दोन क्रमांकावर**

# विराट कोहली, रोहित शर्मानें वर्ष गाजवले

**| मुंबई | प्रतिनिधी |**

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीच्या चर्चा वर्षभरात जोरदार रंगल्या.मात्र दोघांनीही त्यांच्या वनडे कामगिरीने सर्व टीकाकारांना सडेतोड उत्तर दिलं. २०२५ या वर्षात भारतासाठी वनडेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये हे दोघे अव्वल दोन क्रमांकावर आहेत.

यंदाच्या वर्षभरात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या निवृत्तीच्या चर्चांनी जोर धरला. मे महिन्यात दोघांनी अचानक कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर त्याच्या वनडेतील भविष्यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यांनी वनडेतून निवृत्त व्हावे यासाठी अनेक प्रयत्नही झाल्याचे दिसले. मात्र दोघांनीही या संपूर्ण वर्षात त्यांच्या वनडेतील कामगिरीने सर्वच टीकाकारांना सडेतोड उत्तर दिलं आहे. वयाच्या पस्तीशीनंतर हे दोघे कितपत योगदान देतील, असा प्रश्न विचारणाऱ्यांना त्यांनी त्यांच्या बॅटने उत्तर दिल्याचंच आकडेवारीतून दिसून येत आहे.

भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वनडे मालिकेतील तिसऱ्या सामन्यात ९ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिकाही २-१ अशा फरकाने जिंकली. या मालिकेसह भारताचे २०२५



वर्षातील भारताचे वनडे सामने संपले. भारतीय संघासह विराट आणि रोहितसाठी हे वर्ष खास ठरले. भारतीय संघाने २०२५ च्या सुरुवातीलाच वनडेतील प्रतिष्ठीत स्पर्धा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा रोहितच्या नेतृत्वात जिंकली. भारताने १२ वर्षांनी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती.या संपूर्ण वर्षात भारताने १४ वनडे सामने खेळले. यातील ११ सामने भारतीय संघाने जिंकले, तर केवळ ३ सामने पराभूत झाले. भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीशिवाय इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीन संघांविरुद्ध वनडे मालिका खेळली. इंग्लंडविरुद्ध भारताने मायदेशात वनडे मालिकेत ३-० असा विजय मिळवला. तसेच ऑस्ट्रेलिया दौऱ्यात मात्र भारताला वनडे मालिकेत १-२ असा पराभव स्वीकारावा लागला. तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धही नुकतीच भारताने मायदेशात वनडे मालिका जिंकली.

वनडेत विराट आणि रोहितने २०२५ मध्ये मैदानं गाजवली आहेत. या वर्षात वनडेत सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत विराट अव्वल क्रमांकावर आणि रोहित दुसऱ्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे या दोघांमध्ये केवळ एकाच धावेचे अंतर आहे. २०२५ वर्षात विराटने १३ वनडे सामन्यांमध्ये ३ शतके आणि ४ अर्धशतकांसह ६५.१० च्या सरासरीने ६५१ धावा केल्या आहेत. रोहितने २०२५ वर्षात सर्व १४ वनडे सामने खेळले असून ५० च्या सरासरीने २ शतके आणि ४ अर्धशतकांसह ६५० धावा केल्या आहेत. या दोघांव्यतिरिक्त कोणी ५०० धावांचा टप्पाही पार केलेला नाही.

## शमीचे कामगिरीतून निवड समितीला उत्तर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ फायनलनंतर शमी भारतीय संघाबाहेरच आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करूनही त्याला डावलले जात आहे. पण, शमी हार मानणारा नाही आणि तो सातत्याने मैदान गाजवतोय.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या हरयानाविरुद्धच्या लढतीत बंगालच्या गोलंदाजाने चार विकेट्स घेतल्या. त्याने २०२५ च्या या पर्वात आतापर्यंत ७ सामन्यांत १६ विकेट्स घेतल्या आहेत आणि तो सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. बंगालने गटात ६ सामन्यांत ४ विजय मिळवले आहेत आणि त्यात शमीचा महत्त्वाचा वाटा आहे. हैदराबादमध्ये आज सुरू असलेल्या सामन्यात शमीने ४ षटकांत ३० धावा देताना ४ विकेट्स घेतल्या. त्याला आकाश दीपने (२-३२) चांगली साथ दिली.

**शमीची कारकीर्द**

मोहम्मद शमीने भारतासाठी ६४ कसोटीत २२९ विकेट्स घेतल्या आहेत. यावर्षी इंग्लंड दौऱ्यावर त्याला वगळण्यात आले. त्यानंतर घरच्या मैदानावर झालेल्या वेस्ट इंडिज व दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतही त्याची निवड केली गेली नाही. त्याने १०८ वन डे सामन्यांत २०६ व २५ ट्वेंटी-२० सामन्यांत २७ विकेट्स घेतल्या आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)